POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३१० ● मुंबई, बुधवार, ११ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### देशात २०१४ नंतर भ्रष्टाचाराची हिंमत कोणी केली नाही

## मोदींवर एक डाग नाही... एकनाथ शिंदेंकडून स्तुतीसुमने

**मुंबई । प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारभाराला आणि एनडीएला आज ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. मोदींनी देशाची सुत्रे हातात घेतल्यानंतर पूर्ण बदल होत असल्याचे मत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केलं. २०१४ च्या अगोदर रोज भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांच्या बातम्या समोर येत होत्या. मात्र, २०४४ च्या नंतर अशी हिंमत कोणी केले नाही. मोदींवर एक ही डाग नसल्याचे शंदे म्हणाले. ११ वर्षे मोदींनी यशस्वी पंतप्रधान म्हणून काम केल्याबद्दल एकनाथ शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**गेल्या ११ वर्षांत एकही घोटाळ्याची माहिती समोर आली नाही.**

गेल्या अकरा वर्षांत एक ही घोटाळ्याची माहिती समोर आली नाही. पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला होता. यानंतर भारताने आतंकवाद्यांना धडा शिकवला आहे. भारताची ताकत वाढली आहे. २१ वी सदी नरेंद्र मोदी असे एकनाथ शिंदे म्हणाले. यावेळी एकनाथ शिंदे यांनी काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्यावरही टीका केली. राहुल गांधी बाहेर जाऊन देशाची बदनामी करतात. राहुल गांधी हे मोदींवर टीका करतात म्हणजे सूर्यावर थुंकल्यासारखे असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. ज्या पंतप्रधानांनी देशाला पुढे नेले त्यांच्यावर तुम्ही टीका करता असे एकनाथ शिंदे म्हणाले. देश की जनता नहीं आँधी कुच भी करो राहुल गांधी. नरेंद्र मोदी हे पंतप्रधान होऊ नये म्हणून सर्व पक्ष एकत्र आले मात्र शेवटी मोदी आलेच ना असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

**जे मुंबई सोडून बाहेर गेले त्या सवार्ना मुंबईत आणणार**

धारावीच्या मुद्यावरुनही एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर टीका केली. धरावीमध्ये कसे लोक राहतात हे बघा, नाले गटार मच्छर आहेत. एका घरात दहा दहा लोक राहतात. धारावी पुनर्वसनचा मालक सरकार आहे. वस्तुस्थिती जाणून घ्या असे एकनाथ शिंदे म्हणाले. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर लोकांना फायदा होईल ते काम केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. तुम्ही पात्र लोकांना घर द्या म्हटले मी तर सवार्ना घर द्या म्हणतो असेही शिंदे म्हगणाले. जे मुंबई सोडून बाहेर गेले त्या सवार्ना मुंबईत आणणार असल्याचे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिले. रखडलेले प्रकल्प मार्गी लावले आहेत.

निवडणूक आली की मुंबईचा लढा असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंना टोला लगांवला.



**लाडकी बहीण योजना शेतकरी सन्मान योजना सुरु केल्या**

ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच इतर कार्यकर्ते पदाधिकारी यांनी देखील प्रवेश केला सर्वांचे शिवसेनेत स्वागत असल्याचे शिंदे म्हणाले. धाने पाटील अनुभवी आहेत त्यांची हकीगत त्यांनी स्वतः सांगितली आहे. तुम्ही स्वगृही बाळासाहेबांच्या धनुषबाण शिवसेनेत आलेत. धाने पाटील यांच्या सौभाग्यवती या त्यांच्या लाडक्या बहिणी आहेत म्हणून ते तुम्हाला जा म्हटले. महायुती सरकारने जे प्रकल्प रखडलेले होते ते सुरु केले विकास प्रकल्प पुढे नेतो. लाडकी बहीण योजना शेतकरी सन्मान योजना अशा अनेक योजना सुरू केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. विरोधी पक्षाला विरोधी पक्षात राहण्यासाठी देखील आकडेवारी मिळाली नाही असे शिंदे म्हणाले. लोकसभा आणि विधानसभेमध्ये चांगले यश मिळाले आहे. जनतेने धनुष्यबाण शिवसेनेवर विश्वास दाखवला आणि पोचपावती दिल्याचे शिंदे म्हणाले. अनेक कार्यकर्ते पदाधिकारी शिवसेनेत येतात हा पक्ष कार्यकर्त्यांच आहे आंनद दिघे यांची शिकवण आचरणात आणली आणि पुढे जातोय असे शिंदे म्हणाले. महारष्ट्रभरातून शिवसैनिक आपल्या पक्षात येत आहेत. चंद्रहार पाटील यांनी देखील प्रवेश केला आहे.

### लोकल अपघातानंतर मनसे ॲक्शन मोडवर...

## ठाणे शहरात धडक मोर्चा




**मुंबई । प्रतिनिधी :** मुंब्रा रेल्वे दुर्घटनेप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून (मनसे) धडक मोर्चा काढण्यात आला. गावदेवी मैदान ते ठाणे रेल्वे स्थानकापर्यंत मनसेचा मोर्चा सुरू होता. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर ठाणे रेल्वे स्थानकावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला. या मोर्चात मनसेच्या अविनाश जाधवांसह ठाणेकर आणि रेल्वे प्रवासीसुद्धा सहभागी झाले आहेत.

''दरदिवशी रेल्वे अपघातात वीस प्रवाशांचा मृत्यू होतो. यावर लवकरात लवकर उपाय काढण्यासाठी आणि योजना राबविण्यासाठी आम्ही रेल्वे प्रशासनाला ताकिद दिली. गेल्या १५ वर्षांत ५१ प्रवाशांचा रेल्वे अपघाता मृत्यू झाला. त्याला कोण जबाबदार आहे'', असा सवाल अविनाश जाधव यांनी केला. संभावित अपघात होण्याची शक्यता लेखी पत्राद्वारे तीन महिन्यांपूर्वीच वर्तवली असताना रेल्वे प्रशासनाने त्यावर काय कारवाई केली, याची लेखी माहिती सादर करण्याची मागणीही मनसेनं केली.

**मनसेच्या प्रमुख मागण्या-**

- मुंबई लोकलमधील प्रवाशांची संख्या आणि त्या प्रमाणात गाड्यांमधील आसन क्षमतेची उपलब्धी आहे का? याचा तक्ता सादर करा.
- दिवा - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अशी लोकल सेवा चालू करण्यात येणाऱ्या अडचणींची लेखी माहिती द्या.
- रेल्वे अपघात नुकसान भरपाई रक्कम ही अत्यंत तुटपुंजी आहे. ती वाढवून २५ लाख रुपये करावी.
- उशिरा मिळालेला न्याय हा न्याय असूच शकत नाही. त्यामुळे अपघातांच्या केसेस अनेक वर्षे प्रलंबित ठेवण्याचं प्रयोजन काय?
- गेल्या १५ वर्षात ४५ हजार प्रवाशांचा अपघातात मृत्यू झाला. त्यापैकी नुकसान भरपाई मिळण्यासंदर्भातील आठ हजार केसेस अद्यापही प्रलंबित आहेत. त्याची कारणे लेखी द्या.
- एका डब्यामध्ये किती प्रवाशांनी प्रवास करणं रेल्वे प्रशासनाला अपेक्षित आहे. याची नियमावली सादर करा.
- मुंबई लोकल सेवेतून मिळणारं मासिक उत्पन्न तथा मासिक खर्च याची माहिती द्या.

## हुंडा देणार नाही, घेणार नाही! जळगावच्या मंगळगृह मंदिर संस्थानचा पुढाकार, शेकडो भाविकांना दिली शपथ




**जळगाव । प्रतिनिधी :** सासरच्या त्रासाला कंटाळून पुण्यात वैष्णवी हगवणेने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. हुंड्यासाठी हा बळी गेल्याची घटना समोर आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटल्याचे पाहायला मिळाले. पुन्हा अशा प्रकारे कोणत्याही वैष्णवीचा बळी जाऊ नये यासाठी जळगाव जिल्ह्यातील मंगळगृह मंदिर संस्थान पुढे आले आहे. वड पौर्णिमेच्या निमित्ताने एकत्र आलेल्या शेकडो भाविकांनी हुंडा देणार नाही, घेणार नाही, कुटुंब व्यवस्था मोडणार नाही अशा प्रकारची शपथ घेतली आहे.

सासरच्या मानसिक आणि शारिरीक त्रासाला कंटाळून वैष्णवी शशांक हगवणे (२३) हिने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. याप्रकरणी वैष्णवीचा पती शशांक राजेंद्र हगवणे, सासू लता राजेंद्र हगवणे, नणंद करिश्मा, सासरे राजेंद्र हगवणे यांना मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अटक केली आहे. आता आत्महत्येच्या दिवसापर्यंत वैष्णवीला कुटुंबियांकडून मारहाण करण्यात आल्याची माहिती पोस्टमॉर्टम रिपोर्टमधून समोर आली होती. या प्रकरणी पोलिसांनी कारवाई करत सासरच्या मंडळींना अटक केली आहे. अधिकचा तपास पोलिस करत आहेत. दरम्यान, असा घटना घडून नये म्हणून विविध सामाजित संघटनांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहे. हुंडाबंदी करण्यात यावी असी मागणी देखील की जात आहे.

**साध्या पद्धतीने विवाह तसेच कौटुंबिक हिंसाचार न करण्याची घेतली शपथ**

एखाद्या तीर्थक्षेत्रावर अशा पद्धतीने सामूहिक शपथ कार्यक्रम घेणारं मंगळग्रह मंदिर हे राज्यातलं पहिले तीर्थक्षेत्र असल्याचा दावा संस्थांचे विश्वस्त दिगंबर महाले यांनी केला आहे

पुण्यातील वैष्णवी हगवणे घटनेनंतर समाजात जागृती व्हावे, यासाठी अमळनेरच्या मंगळ ग्रह मंदिर संस्थांनी पुढाकार घेतला असून त्याच पार्श्वभूमीवर सामूहिक शपथेचा कार्यक्रम घेण्यात आला आहे. हुंडा घेणार नाही आणि देणार नाही. लग्न समारंभातील अतिरिक्त खर्च यासह चुकीच्या प्रथा मोडून साध्या पद्धतीने विवाह तसेच कौटुंबिक हिंसाचार न करण्याची शपथ यावेळी उपस्थित भाविकांनी घेतली. वैष्णवी हगवणे सारखी घटना राज्यात पुन्हा कुठल्याही तरुणीसोबत घडू नये हाच या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचं विश्वस्त दिगंबर महाले म्हणाले. तसेच पुढील काळात मंगळ ग्रह मंदिरावर येणाऱ्या प्रत्येक भाविकाला अशा पद्धतीची शपथ दिली जाईल अशी माहिती दिगंबर महाले यांनी दिली.

## व्हिडिओ पाहून अंगावर काटा येईल...

### टोल वाचवण्यासाठी चालकाने टोल कर्मचाऱ्याच्या अंगावरच गाडी घातली

**चंद्रपूर । प्रतिनिधी :** चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर शहराजवळील टोल नाक्यावर दोन दिवसांपूर्वी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका पिकअप वाहनाने टोल टाळण्यासाठी चक्क कर्मचाऱ्याच्या अंगावरच गाडी घातली आहे. या घटनेत संजय वांढरे नावाचा ३४ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यातील चंद्रपूरमधील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेचा व्हिडिओदेखील सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.

पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरोधात हत्येचा प्रयत्नअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपी घटनेनंतर घटनास्थळावरुन फरार झाला होता. आरोपीच्या शोधासाठी पोलिसांचे एक पथक रवाना झाले होते. स्थानिक प्रशासन आणि टोल प्रशासनाने या घटनेचा निषेध नोंदवला आहे. तसंच, त्या पिकअप चालकाला लवकरात लवकर अटक करावी अशी मागणी केली आहे. पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार उउळश्च्या आधारे पोलिस आरोपीची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत आहेत. तसंच, लवकरच त्याला अटक करण्यात येईल.

संजय वांढरे हे बल्लारपूर शहरातील गांधी वॉर्ड



परिसराचे रहिवासी असून ते टोल नाक्यावर कार्यरत होते. एक पिकअप वाहन टोल न भरता टोल नाका वाचवत पळण्याचा प्रयत्न करत होते. यावेळी संजय वांढरे यांनी वाहन अडवण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने गाडी थांबवण्याऐवजी त्यांच्या अंगावर गाडी घातली. हा सर्व घटनाक्रम व्हिडिओत कैद झाला आहे.

**अक्कलकोटमध्ये भाविकांची ट्रॅव्हल्स आणि ट्रकचा भीषण अपघात**

सोलापूर अक्कलकोट महामार्गावर ट्रक आणि बसचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात दोन जण ठार झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. वळसंगजवळील कर्जाळयेथील उभ्या असलेल्या ट्रकला बसनी धडक दिली आहे. भरधाव वेगाने ट्रॅव्हल्स बसने ट्रकला धडक दिल्यामुळे बसच्या डाव्या बाजूचे मोठे नुकसान झाले आहे. पुण्यावरून अक्कलकोटकडे देवदर्शनला जात असताना झाला अपघात.

## महाराष्ट्रातील वातावरणात बदल!

### पुढील आठवडाभर कसं असेल हवामान?

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील वातावरणात बदल होत आहे. काही भागात तुरळक पाऊस पडत आहे, तर काही ठिकाणी पावसाचा जोर कमी झाल्याचे दिसत आहे. दरम्यान, राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार असल्याची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. भागत बदलत राज्यात पाऊस पडणार असल्याचे डख म्हणाले. राज्यात नेमका कुठं कुटं पाऊस पडणार याबाबतची सविस्तर माहिती पाहुयात. राज्यात १० ते ११ जूनच्या दरम्यान दक्षिण महाराष्ट्राकडे पाऊस पडणार आहे. पण सर्व राज्यात सांगायचं झालं तर ११ जूनपासून म्हणजे १२ ते १३ जूनच्या नंतर पाऊस वाढत जाणार असल्याची माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे. पूर्व विदर्भ, पश्चिम विदर्भाकडे ११ च्या नंतर १२ ते १३ जूनला पाऊस येणार आहे. दक्षिण महाराष्ट्राकडे १०, ११, १२ जून पासूनच पाऊस चांगल्या प्रमाणात पडणार असल्याचे पंजाबराव डख म्हणाले. मराठवाड्यामध्ये आज तुरळक ठिकाणी पाऊस पडणार आहे. त्याच्यानंतर ११ जूनला मराठवाड्याकडे चांगला पाऊस वाढत जाणार आहे. मराठवाड्याकडे ११ जून पासून ते २० जून दरम्यान चांगला पाऊस पडणार आहे. दररोज भाग बदलत मराठवाड्यात पाऊस पडणार असल्याची माहिती पंजाबराव डख म्हणाले. उत्तर महाराष्ट्रातल्या शेतकऱ्याला सांगू इच्छितो की, १२ जून पासून ते २० जून पर्यंत दररोज वेगवेगळ्या भागात पाऊस पडणार आहे. पश्चिम महाराष्ट्रा १० जून पासून ते २० जून पर्यंत दररोज वेगवेगळ्या भागात भाग बदलत दररोजच पाऊस पडणार आहे. राज्यात १२ जून नंतर पावसाची व्याप्ती वाढत जाणार आहे. १३ ते २० जून दरम्यान राज्यात सगळीकडे भाग बदलत बदलत पाऊस पडणार आहे.

**पाच वर्षांपासून साजरी होतेय पिंपळ पौर्णिमा**

पुरुषांच्या समस्या, त्यांच्यावर होणारे अन्याय आणि तत्सम मुद्द्यांकडे समाज आणि शासनाचं लक्ष वेधण्यासाठी म्हणून पत्नी पीडित पुरुष आश्रमाकडून पाच वर्षांपासून ही पौर्णिमा साजरी केली जात आहे. पुरुषांप्रतिसुद्धा समाजिक मानसिकता सुधारण्याची गरज असल्याची मागणी या संघटनेकडून केली जात आहे.

## भांडखोर बायको नको रे बाबा!

### म्हणत पुरुषांकडून पिंपळाला प्रदक्षिणा अन् प्रार्थना



**सांगली । प्रतिनिधी :** दरवर्षीप्रमाणे यंदाच्याही वर्षी वटपौर्णिमेच्या दिवशी वडाच्या वृक्षाभोवती प्रदक्षिणा घालत आणि यथासांग त्याची पूजाअर्चा करत महिला पतीच्या दीघार्युष्यासाठी प्रार्थना करताना दिसत आहेत. विवाहाचं हे नातं सात जन्मांसाठी टिकून रहावं आणि याच जोडीदाराची आपल्याला साथ मिळाली, जोडीदाराला उदंड आयुष्य लाभावं यासाठी केली जाणारी ही पूजा. मात्र आधुनिक काळात याच वटपौर्णिमेला फटा फोडणारी एक नवी प्रथाही अनेकांचच लक्ष वेधत आहे.

एकिकडे जन्मोन् जन्मी हाच पती हवा यासाठी महिलांचे उपवास, पूजाअर्चा सुरू असताना दुसरीकडे मात्र छत्रपती संभाजीनगर इथं पिंपळ पौर्णिमा साजरा करण्यात आली. पिंपळाला ७ प्रदक्षिणा मारत पतीला वेठीस धरणाऱ्या, वैवाहिक जीवनात कलह करणाऱ्या पत्नी पुढच्या जन्मात नको रे बाबा! अशीच प्रार्थना करत पुरुषांनी पिंपळ वृक्षाला ७ प्रदक्षिणा मारल्या. पत्नीपीडित संघटनेनं हा उपक्रम राबवल्याचं सांगण्यात आलं.

महिलांनी हाच पती हवा यासाठी वडाच्या वृक्षाभोवती प्रदक्षिणा मारल्या तरीही काही महिला मात्र इथं अपवाद ठरत असून महिला सक्षमीकरणासाठीच्या कायद्याचा दुरुपयोग करताना दिसतात. अनेकदा कायद्याचा दुरुपयोग करताना दिसतात. काही महिला कायद्याच्या नावाखाली पतीला आणि पतीच्या कुटुंबाला अडकवतात, अशा परिस्थितीमध्ये पुरुषांचाही मानसिक छळ होतो. याचाच विरोध म्हणून प्रतिकात्मक स्वरुपात ही पिंपळ पौर्णिमा साजरी केली जाते असं या संघटनेचं मत.

## एकाच वेळी ३५० जणावंर गुन्हा दाखल

### थेट फेसबुकने दिली चाइल्ड पॉर्नोग्राफी करणाऱ्यांची माहिती

**पुणे । प्रतिनिधी :** सोशल मीडियाचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. नाशिककमध्ये एकाच वेळी ३५० जणावंर गुन्हा दाखल झाला आहे. थेट फेसबुकने दिली चाइल्ड पॉर्नोग्राफी करणाऱ्यांची माहिती दिली आहे. सायबर पोलिसांची ही सर्वात मोठी कारवाई मानली जात आहे.

लहान मुलांचे अश्लील व्हिडीओ, छायाचित्रे सोशल मीडियाच्या वेगवेगळ्या साइट्सद्वारे स्वतःच्या प्रोफाइलवरून प्रसारित केल्याप्रकरणी नाशिकमधील सुमारे ३५७ नेटिझन्सविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याप्रकरणी थेट मेटा कंपनीकडून भारत सरकारला वेगवेगळ्या राज्यांमधील अशाप्रकारचे कृत्य करणाऱ्या नेटिझन्सच्या प्रोफाइलधारकांची माहिती पुरविण्यात आली होती. या माहितीची पडताळणी




करत केंद्र सरकारकडून र सरकारकडे ती माहिती पाठविण्यात आली. या माहितीची अंतिमतः छाननी करत टिपलाइन द्वारे प्रत्येक शहरासह ग्रामीण सायबर पोलिसांना आयपी ॲड्रेसनुसार प्रोफाइलधारकांची माहिती देण्यात आली. नाशिक शहर सायबर पोलिसांना प्राप्त झालेल्या पेनड्राइव्हमधील डेटानुसार तीनशेपेक्षा जास्त प्रोफाइलधारकांवर माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत कलम ६७ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे सुभाष ढवळे यांनी दिली.

राज्य सरकारकडून प्राप्त झालेल्या ''टिपलाइन'' मधील माहितीच्या आधारे शहर सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. चाइल्ड पॉर्नोग्राफी हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा ठरतो. अल्पवयीन मुला-मुलींची अश्लील छायाचित्रे किंवा व्हिडीओ समाजमाध्यमांद्वारे प्रसारित केल्यास किंवा डाउनलोड केल्यास हे कृत्य चाइल्ड पॉर्नोग्राफीच्या प्रकारात - समाविष्ट होते. सोशल मीडियाच्या वेगवेगळ्या साइट्सवर स्वतःच्या प्रोफाइलवरून नेटिझन्सकडून नाशिक शहरातील वेगवेगळ्या ठिकाणांहून वेगवेगळ्या कंपनीच्या इंटरनेटचा (आयपी ॲड्रेस) वापर करत २०२२-२३ या कालावधीत मुलांचे अश्लील व्हिडीओ छायाचित्रे प्रसारित केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

## प्रेयसीचा मृतदेह सरणावर असताना प्रियकराने केले भयंकर कृत्य

**नागपूर । प्रतिनिधी :** नागपूरमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. नागपूर जिल्ह्याच्या कन्हान येथील १९ वर्षीय तरुणीने गळफास घेत आत्महत्या केली. ८ जून रोजी अंकिताने आत्महत्या केली. त्यानंतर शवविच्छेदनानंतर अंकितावर अत्यंसंस्कार सुरू होता. अत्यंसंस्कार सुरू असतानाच तिच्या प्रियकराने तिच्या सरणावर जाऊन उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. अनुराग मेश्राम असं या तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अंकिताचे अत्यंसंस्कार सुरू असताना अनुरागने अचानक



तिच्या सरणावर उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. तेव्हा अंत्यसंस्कारासाठी आलेल्या नागरिकांनी अनुराग मेश्रामला चांगलाच चोपला. अनुराग सध्या कामठी परिसरात एका खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. चारित्र्यावर संशय घेतल्यामुळे एका विवाहितेने आत्महत्या केली आहे. सासरच्या जाचाला कंटाळून एरंडोल येथील विवाहितेने संपवली आपली जीवनयात्रा संपवली आहे. मनिषा सागर सोनार, वय ३४ वर्षे या विवाहित महिलेचे नाव आहे. याप्रकरणी एरंडोल पोलीस स्टेशनला मृत महिलेचे भाऊ मनोज माधवराव पोतदार यांनी फिर्याद दिल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला. मनिषा हीचा सागर पल्लीवाळ (सोनार) यांच्याशी २०१४ मध्ये विवाह झाला होता, त्यांना शर्विल नावाचा ९ वर्षांचा मुलगा आहे. सागर पल्लीवाळ हा पुणे येथे नोकरीस असून तो पुण्यातच राहतो. सासरी सातत्याने सासरच्या मंडळींकडून त्यावर संशय घेत असल्याच्या जाचाला कंटाळून तिने गळफास घेत आत्महत्या केल्याचे समोर आले आहे.

अंकिता आणि अनुराग हे एकाच गावातील असून त्या दोघांमध्ये मैत्री होती. या मैत्रीच्या वाटेत पुढे अडसर असल्याने अंकिताने राहत्या घरी रविवारी गळफास घेत आत्महत्या केली. यामध्ये अंकिताने लिहून ठेवलेल्या चिठ्ठी मध्ये माज्या मृत्यूसाठी अनुराग मेश्रामला जबाबदार धरू नये आणि अनुरागला काहीही करू नये, असा उल्लेख केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अंकिताचे शवविच्छेदन पार पडल्यानंतर दुपारी चार वाजताच्या सुमारास अंत्यसंस्काराची तयारी सुरू होती. तिच्यावर अंत्यविधी पार पाडत असताना अचानक अनुराग मेश्राम हा तिथे पोहोचला. त्याने सरणावर उडी घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न त होता. घटनेच्या माहितीनंतर अनुरागच्या वडील आणि भावांनी त्याला लगतच्या रुग्णालयात दाखल केले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहे. सरणावर उडी घेत असताना त्याने कुठलेतरी द्रव्य प्राशन केले असल्याचा पोलिसांचा संशय आहे. वैद्यकीय अहवालानंतरच या सगळ्या बाबीचा खुलासा होणार असल्याची माहिती पुढे येत आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# लोहमार्गावरचे जीवघेणे कोंडवाडे

**मुंबईच्या उपनगरी रेल्वेतील जीवघेणी गर्दी आणि गैरव्यवस्थापन वारंवार प्रवाशांच्या जीवावर बेतते आहे. दिवा-मुंब्रा येथे झालेल्या अपघाताने रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर प्रकाश टाकला आहे. अपुऱ्या सुविधा, रखडलेले प्रकल्प आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.**

महामुंबईची जीवनवाहिनी असलेली उपनगरी रेल्वे ही प्रत्यक्षात जीवघेण्या कोंडवाड्यांप्रमाणेच असते, याचा दाहक प्रत्यय आठवड्याच्या प्रारंभीच आला. दिवा-मुंब्रा या मध्य रेल्वेवरील गर्दीच्या स्थानकांदरम्यान कसारा लोकलमध्ये झालेल्या अपघातात उमद्या वयातील कमावती माणसे मरणाच्या दारात फेकली गेली. त्यातून वाचले त्यांनाही आयुष्यभराची झुंज चुकलेली नाही. उपनगरी रेल्वेप्रवाशांनी कायम कोंडवाड्यात कोंबलेल्या गुरा-ढोरांप्रमाणेच प्रवास करावा, असे सर्वांनी गृहीत धरले आहे काय? उपनगरी रेल्वेतून दिवसाला सरासरी सहा ते सात जणांचा मृत्यू ओढवतो. लोकलच्या फुटबोर्डावरून प्रवास करणे हा रेल्वे कायद्यानुसार गुन्हा धरला जातो; परंतु असा प्रवास करण्यास रेल्वेची गैरव्यवस्थाच भाग पाडते. अपघातानंतर सर्व उपनगरी गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसविण्याची घोषणा रेल्वेने करून टाकली. जिवाच्या सुरक्षेसाठी तसे करायलाही हरकत नाही. परंतु अशा दरवाजामुळे विलंब होऊन प्रवाशांच्या वाट्याची एखादी गाडी कमी होऊ शकते किंवा प्रवासी वाहून नेण्याची क्षमता. त्यामुळे सरकत्या दरवाजाची घोषणा कुचकामीच ठरण्याची शक्यता अधिक. रेल्वेच्या बाबतीत कोणतीही दुर्घटना ही 'ॲक्सिडेंट वेटिंग टू हॅपन' म्हणजेच 'हे तर कधीही घडू शकले असते,' या स्वरूपाची असते. गेल्या काही वर्षांत ठाण्यापासून पुढे कल्याण, बदलापूर, अंबरनाथ तसेच ट्रान्सहार्बर मार्गावर वाशी, पनवेलपर्यंत आणि पश्चिम उपनगरांत विरार-डहाणूपर्यंत प्रवासीसंख्या कमालीची वाढली आहे. तीन वर्षांपूर्वी ठाणे ते दिवादरम्यान दोन मार्गिका नव्याने टाकण्यात आल्या. पाचव्या-सहाव्या ट्रॅकमुळे ठाणे-कल्याण मार्गावर फेऱ्या वाढतील, ही प्रवाशांची अपेक्षा मात्र फोल ठरली. ज्या काही गाड्या वाढविल्या, त्यापैकी बहुतेक गाड्या पूर्वीच्या गाड्यांच्या बदल्यात वातानुकूलित, इतकाच काय तो बदल झाला. तोही प्रवाशांच्या जिवावर उठणाराच ठरला. पारसिक टेकडीवर जीव धोक्यात घालून लोक राहतात. न करो, परंतु इथे दुर्घटना घडल्यास, पारसिकच्या बोगद्याचे तोंडच बंद होऊ शकते. गेल्या १२ वर्षांत १५ डब्यांच्या गाड्यांच्या फेऱ्यात वाढ झालेली नाही. ट्रान्सहार्बर मार्गावर दिघा रेल्वेस्थानकाची उभारणी रडतखडत झाली; परंतु बेकायदा झोपड्यांपायी हा रेल्वेमार्ग कळव्याला जोडण्याचे काम रखडले आहे. साहजिकच ठाण्याचे दहाही फलाट तिन्हीत्रिकाळ गर्दीने ओसंडून वाहत असतात. या परिसरातील आमदार, खासदार व नेतेमंडळी केवळ झोपड्यांच्या रदबदलीसाठी आंदोलने करतात. समस्येवर ठोस तोडगा सुचवत नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई व महाराष्ट्राच्या खासदारांनी आणि नेतेमंडळींनी उपनगरी रेल्वेचे प्रश्न दिल्लीदरबारी किती गांभीर्याने लावून धरले, हा संशोधनाचा विषय ठरेल. रस्त्यांच्या प्रकल्पांचे आकडे हजारो कोटींच्या घरात असतात, उपनगरी रेल्वे प्रकल्प कमी खर्चाचे असतात, हे त्याचे कारण असावे काय? कोव्हिडनंतर उपनगरी रेल्वेने पुन्हा ७० लाखांच्या प्रवासीसंख्येपर्यंत मजल मारली आहे. परंतु, लोहमार्ग पाण्याखाली जावोत किंवा ओव्हरहेड वायर तुटो; लोकलमध्ये बसलेल्या प्रवाशांना त्याची माहिती मिळण्याची सुतराम शक्यता नसते. इंडिकेटरवरील वेळांशी तर लोकलच्या वक्तशीरपणाचा छत्तीसचा आकडा असतो. उद्घोषणेद्वारे माहिती देण्याची प्रशासनाला गरज वाटत नाही. एकेका लोकलला होणारा विलंब म्हणजे गर्दी वाढल्याने प्रवाशांच्या जिवाशी खेळच असतो. गळकी छपरे, बंद पंखे, रखडलेले पूल हे तर प्रवाशांच्या पाचवीलाच पूजलेले. दिवा-मुंब्रासारख्या घटना घडल्यास मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी प्रश्नांना सामोरे जायला हवे. शाही आणि सुस्त कारभाराची सवय जडलेल्या रेल्वे अधिकाऱ्यांनी स्वतः बदलापूर किंवा नालासोपाऱ्यातून दुसऱ्या वर्गाने रांगेत तिकीट काढून गर्दीच्या वेळी किंवा मेगाब्लॉकच्या दिवशी प्रवास करावा, तरच त्यांना प्रवाशांच्या यातनांची जाणीव होईल. गर्दीच्या वेळी तर तिकीट तपासनीसही गाडीत शिरायला धजावत नाहीत. स्वच्छतेच्या बाबतीत तेवढे रेल्वेला आपण गुण देऊ शकतो. मात्र रेल्वेचे प्रगतिपुस्तक धुळीस मिळविण्यासाठी आपले नागरिक सज्ज आहेत. मग रेल्वेची शक्ती लोहमार्गाच्या कुंपणावर जाळ्या लावण्यात खर्ची होते. मुंबईतील लोंढ्यांवरून हाकारे देणाऱ्यांपासून ते वाहतुकीच्या समृद्धीचे गुणगान करणाऱ्यांपर्यंत कोणत्याही राजकारण्यांनी मुंबईच्या उपनगरी रेल्वेच्या प्रश्नांचा सज्जडपणे व सातत्याने पाठपुरावा केलेला नाही. कार्यालयांच्या वेळा बदलण्याचा उत्साह काही दिवस टिकला; परंतु त्यातून लक्षणीय काही हाती लागलेले नाही. लोकलच्या गर्दीत लळत-लोंबत प्रवास करणारे कर्मचारी महापालिका, मंत्रालय, पोलिस आणि खासगी आस्थापनांची कार्यालये गाठतात. मात्र मुकी बिचारी कुणीही हाका, अशी त्यांची केविलवाणी स्थिती आहे.

# राज्यात विकास नव्हे, लूट सुरू आहे!



पायाभूत सुविधांच्या नावाखाली लाखो कोटी रुपयांचे कर्ज काढून कामे सुरू केली जात आहेत. कामे कोणाला द्यायची हे अगोदरच ठरवून निविदा प्रक्रिया मॅनेज केल्या जात आहेत. यातून निविदा द्या आणि कमिशन घ्या, असा उद्योग बिनबोभाटपणे सुरू आहे. प्रत्येक मोठ्या प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेबाबत लोकांच्या मनात शंका आहे. प्रत्येक कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या चर्चा कानावर पडतात.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात विकासाच्या नावाखाली जे काही सुरू आहे ती योजनाबद्धरीतीने सुरू असलेली लूट आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळापासून गावच्या पारापर्यंत सुरू आहे. खेडेगावापासून मुंबईपर्यंत महाराष्ट्राचा कारभार हा ठेकेदार आणि त्यांना पोसणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या हिशेबाने सुरू आहे. राज्यातल्या सर्वसामान्य जनतेशी सत्ताधाऱ्यांना काही देणेघेणे राहिलेले नाही. पायाभूत सुविधांच्या नावाखाली लाखो कोटी रुपयांचे कर्ज काढून कामे सुरू केली जात आहेत. कामे कोणाला द्यायची हे अगोदरच ठरवून निविदा प्रक्रिया मॅनेज केल्या जात आहेत. यातून टेंडर द्या आणि कमिशन घ्या, असा उद्योग बिनबोभाटपणे सुरू आहे. प्रत्येक मोठ्या प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेबाबत लोकांच्या मनात शंका आहे. प्रत्येक कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या चर्चा कानावर पडतात. मुंबईतील मोकळ्या जागा कवडीमोल दराने लाडक्या लोकांना खिरापतीप्रमाणे वाटल्या जात आहेत. भ्रष्टाचाराची कीड सरकार प्रशासनाकडून आता विधिमंडळाच्या समित्यांपर्यंत पोहोचली आहे. धुळे, नंदूरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या विधिमंडळाच्या अंदाज समितीच्या अध्यक्षांच्या स्वीय सहाय्यकांच्या सरकारी विश्रामगृहातील खोलीत एक कोटी ८४ लाख रुपयांची रक्कम सापडली. या घटनेला दोन आठवडे उलटून अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. त्यामुळे राज्यात आता भ्रष्टाचाराला राजमान्यता दिली आहे का? असा गंभीर प्रश्न राज्यातील जनतेला पडला आहे?

### धुळ्यात भ्रष्टाचाराची झलक

प्रशासकीय आणि सरकारी पातळीवर चिरीमिरीशिवाय कामे होत नाहीत, हे वर्षानुवर्षांचे वास्तव आहे. लाच घेताना रंगेहाथ पकडल्याशिवाय लाचखोरी होते, हे सिद्ध होत नाही. लाच देणारा आणि घेणारा दोघेही राजीखुशीने व्यवहार करतात तोही भ्रष्टाचार आहे. पण तो सहजपणे सिद्ध होत नाही किंवा करता येत नाही. गल्लीपासून दिल्लीपर्यंत असेच व्यवहार सुरूच असतात. भ्रष्टाचाराच्या या भस्म्या रोगाची लागण आता विधिमंडळाच्या समित्यांनाही झाली आहे का? असा गंभीर प्रश्न धुळ्यातील घटनेने निर्माण झाला आहे. विधिमंडळाची अंदाजपत्रकीय समिती धुळे-नंदूरबार दौऱ्यावर असताना गुलमोहर शासकीय विश्रामगृहातील समिती अध्यक्षाच्या स्वीय सहाय्यकाच्या खोलीतून एक कोटी ८४ लाख रुपयांची रक्कम सापडली. यासाठी माजी आमदार अनिल गोटे यांना काही तास या खोलीबाहेर धरणे द्यावे लागले. या प्रकरणात अद्याप कोणालाही अटक करण्यात आली नाही. पैसे कुठून आले? कोणी आणले? कोणाला द्यायचे होते? याचा तपास लागला नाही. विश्रामगृहाचे सीसीटीव्ही फुटेज कुठे आहे? तपास कुठपर्यंत पोहोचला याबाबत काही माहिती समोर येत नाही? यावरून वरिष्ठ पातळीवरून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे, हे स्पष्ट होते.

### घोडबंदर-भाईंदर बोगदा- तीन हजार कोटींचा घोटाळा

टेंडर काढणे, ते मॅनेज करणे आपल्या लाडक्या कंत्राटदाराला देणे व कमिशन घेणे हे काम किती सफाईदारपणे केले जाते याचे उत्तम उदाहरण म्हणजे घोडबंदर व भाईंदर बोगदा व उन्नत मार्गाचे काम. एलअँडटीसारख्या नामांकित आणि अनुभवी कंपनीची निविदा तांत्रिक कारणे देऊन फेटाळण्यात आली व मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला १४ हजार कोटींचे कंत्राट बहाल करण्यात आले. एलअँडटीपेक्षा मेघा इंजिनिअरिंगची निविदा तीन हजार कोटी रुपये जास्त होती. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत "निविदा प्रक्रिया पुन्हा राबवा, अन्यथा प्रकल्पाला स्थगिती देऊ" अशी कठोर भूमिका घेतल्याने एमएमआरडीएने निविदा प्रक्रिया रद्द केल्याने तीन हजार कोटी रुपये वाचले. पण हे तीन हजार कोटी रुपये कोणाच्या घशात जाणार होते? हे कधी उघड होणार?

### समृद्धी महामार्गातून कोणाची समृद्धी

२०१६ साली तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाची घोषणा केली त्यावेळी त्याची किंमत ४६,००० कोटी रुपये होती. २०१८मध्ये ती वाढून ४९,२४७ कोटी रुपये झाली. एमएसआरडीसीने टेंडर प्रक्रियेनंतर ती पुन्हा वाढवून ५५ हजार कोटींवर नेली. काम पूर्ण होईपर्यंत ती ७० हजार कोटी रुपयांपर्यंत जाईल असे जाणकार सांगतात. या महामार्गाची अधिसूचना जारी होण्याआधी या मार्गालगत राजकीय नेते आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी जमिनी खरेदी केल्या. अधिसूचनेनंतर जमिनींच्या किमती वाढल्या. या जमिनींचा पाचपट मोबदला या नेत्यांनी आणि अधिकाऱ्यांनी घेतल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी विधानसभेत केला होता. या रस्त्याच्या कामात १५ हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप विरोधक करतात. या महामार्गामुळे मराठवाडा विदर्भाची समृद्धी कधी होईल ते माहीत नाही. पण सरकारी अधिकारी, दलाल आणि ठेकेदारांना मात्र समृद्धी आली आहे हे नक्की.

### पुणे रिंग रोड

एमएसआरडीसीने पुणे रिंग रोडसाठी टेंडर काढले. एकूण नऊ पॅकेजमध्ये हे काम दिले आहे. १४.६ किलोमीटरच्या पहिल्या पॅकेजची अंदाजपत्रकीय किंमत १९०४ कोटी असताना हे काम मेगा इंजिनिअरिंग कंपनीला ४० टक्के जास्त दराने म्हणजे २६६१ कोटी रुपयांना दिले आहे. दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या पॅकेजचे काम अशाचप्रकारे नवयुग या कंपनीला ३७ टक्के वाढीव दराने देण्यात आले आहे. सातव्या पॅकेजचे काम पीएनसी नावाच्या कंपनीला जवळपास ४६ टक्के वाढीव दराने दिले आहे. हे काय चालले आहे. ४०- ४५ टक्के वाढीव दराने ही कामे दिली जात आहेत.

### विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉर

या कामाच्या वेगवेगळ्या पॅकेजची कामे ही ३५- ४० टक्के वाढीव दराने दिली आहेत. या प्रकल्पासाठी २५ टक्केही भूसंपादन झाले नसताना आचारसंहितेत टेंडर काढले. पनवेल परिसरात जिरायती शेतीला बागायती दाखवून फार मोठ्याप्रमाणे शासनाच्या पैशाची लूट केल्याचे आरोप झाले. न्यायालयाच्या आदेशाने काही अधिकाऱ्यांवर गुन्हेही दाखल झाले आहेत.

याचप्रमाणे जालना-नांदेड समृद्धी महामार्ग, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती महामार्ग, भंडारा, गोंदिया द्रुतगती महामार्ग, नागपूर, गोंदिया द्रुतगती महामार्गाच्या कामाचे टेंडरही अशाच पद्धतीने ३०-३५ टक्के वाढीव दराने दिले आहेत. ही सर्व कामे मोजक्या पाच ते सहा ठेकेदारांना दिली जात आहेत. त्याच कंपन्या सगळीकडे टेंडर भरतात आणि त्यांनाच कामे वाटून दिली जातात. या कामांसाठी सरकार कर्ज काढत आहे. त्या कर्जाचे व्याज आणि वरून टोल म्हणजे जनतेची तिहेरी लूट करून सरकार, अधिकारी आणि ठेकेदारांची घरे भरण्याचा सरकारी उद्योग महाराष्ट्रात सुरू आहे.

### विकासाचे नाव घेऊन लुटीचा रथ धावत आहे

हा सारा प्रकार म्हणजे 'विकासाच्या घोड्यावर बसून भ्रष्टाचाराचा रथ हाकला जातोय' अशीच स्थिती आहे. वरून 'विकास' दिसतो, पण आत लूट आणि अपारदर्शकता आहे. वास्तविक पाहता, ही सगळी प्रणाली लोकशाही मूल्यांची थट्टा करणारी आहे. जनतेच्या विश्वासाचा, कररूपाने दिलेल्या पैशांची खुलेआम लूट सुरू आहे. विकास आणि पायाभूत सुविधांच्या गप्पा मारणारे नेते प्रत्यक्षात विकासाच्या नावावर फक्त लूट करत आहेत. याला जर वेळीच अटकाव न लावला, तर महाराष्ट्र ही केवळ 'कमिशनचा कॉरिडॉर' बनून जाईल.

## चोर सोडून...



मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती यांनी गेल्या आठवड्यात गुन्हे आढावा परिषदेत सर्व पोलिसांची झाडाझडती घेतली व खडे बोल सुनावले. मुंबईसह महामुंबई परिसरातील सर्वच पोलिस आयुक्तांनी वरचेवर या प्रकारे आढावा घेण्याची गरज आहे. मुंबईतील गुन्हेगारीचे स्वरूप गेल्या दोन दशकांत पालटले आहे. तंत्रज्ञानावर पोलिसांची मदार वाढू लागली आहे, तर गुन्हेही तंत्रज्ञानाच्या बुरख्याआडून घडताहेत. या सर्व पार्श्वभूमीवर पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदविताना येणाऱ्या कटू अनुभवांतून मात्र सर्वसामान्यांची सुटका झालेली नाही. मुंबईभर विस्तारणारे सीसीटीव्हीचे जाळे गुन्हेगारांवर पाळत ठेवण्याच्या दृष्टीने चांगलेच आहे. परंतु एखाद्या नागरिकाच्या संकुलात किंवा व्यापारी गाळ्यात सीसीटीव्ही नसतील, तर फुटकळ चोरी (पोलिस किंवा चोरांच्या नजरेतून) झाल्यावर त्या नागरिकानेच गुन्हा केला आहे, अशा प्रकारे पोलिस धारेवर धरतात. चोरीचा ऐवज कितीचा आहे, त्यावरूनही फिर्याद नोंदविण्याचे गांभीर्य ठरणे योग्य नाही. काही दिवसांपूर्वी एका जुन्या गृहसंकुलातील सदनिकेत चोरांनी दोन-तीन घरे फोडली. रहिवाशाने याविषयी नियंत्रण कक्षात संपर्क साधला असता, सोने-नाणे गेले नाहीये ना, मग स्पॉट व्हिजिटला कुणी येणार नाही, असे सांगितले गेले. तक्रारदाराने तगादा लावल्यावर कूर्मगतीने एक व्हॅन पोहोचली, तरी पंचनामा, फोटो वगैरेची गरज पोलिसांना वाटली नाही. पोलिस ठाण्यात पोहोचल्यावरही अमलदारबाईंनीही, फिर्याद करणे कसे योग्य नाही, हेच पटवून देण्याचा प्रयत्न केला. दोन-चार हजारांच्या चोरीसाठी तुम्हाला न्यायालयात चकरा माराव्या लागतील, हे कळवळा आल्यागत सांगितले. मात्र, अशा संभाव्य टोळ्यांचा छडा लावण्याच्या दृष्टीने काही माहिती घेणे पोलिसांना महत्त्वाचे वाटले नाही. फॉरेन्सिक पुरावे जतन करण्याचे पोलिस आयुक्तांनी बजावले आहे, ते त्यामुळेच.

# बिनविरोध निवडीचा गुंता

निवडणुकीच्या रिंगणात जर एकच उमेदवार असेल तर निवडणूक आयोगाने तो उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर न करता त्या मतदार संघात निवडणूक घेऊन त्या उमेदवाराला किमान १०-१५ टक्के मते मिळाल्यासच त्याला निवडून आल्याचे जाहीर करावे, यासाठी अशा उमेदवारांना किमान किती टक्के मते मिळाली पाहिजेत या संबंधी संसदेने कायदा करावा,असे मत न्या. सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने व्यक्त केले असून यासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी केंद्र सरकारला चार आठवड्याची मुदत दिलेली आहे.



एखादा संपन्न उमेदवार त्याच्या विरोधातील इतर सर्व उमेदवारांना प्रलोभन दाखवून अथवा गुंडगिरीच्या आधारे त्यांचे उमेदवारी अर्ज मागे घ्यावयास भाग पाडत असल्याच्या घटना घडू शकतात. यासाठी निवडणुकीच्या रिंगणात एकच उमेदवार असला तरी निवडणूक घेऊन त्याला किमान १०-१५ टक्के तरी मते मिळाली पाहिजेत, अशी कायदेशीर तरतूद करणे आवश्यक असून ते प्रगतिशील पाऊल ठरेल. जर अशा उमेदवाराला पाच टक्के मतदारांचाही पाठिंबा मिळत नसेल तर अशा व्यक्तीला संसदेमध्ये खासदार म्हणून जाऊ देणे योग्य कसे ठरते, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

विधी सेंटर फॉर लीगल रिसर्चने दाखल केलेल्या एका जनहित याचिकेत निवडणुकीच्या रिंगणात एकच उमेदवार असल्यास तो बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यासंबंधीचे लोकप्रतिनिधित्व कायदा, १९६१ चे कलम ५३(२)हे घटनाबाह्य असून ते रद्द करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज वि. युनियन ऑफ इंडिया या प्रकरणात १३ सप्टेंबर, २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रिंगणात उतरलेल्या उमेदवारांपैकी एकही उमेदवार हा लोकप्रतिनिधी होण्यास लायक, पात्र व पसंत नाही असे जर मतदारांचे मत असेल तर त्यांना ते मत व्यक्त करण्याचा अधिकार नकारात्मक मतदानाद्वारे देणे आवश्यक आहे. यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर किंवा मतपत्रिकेवर 'वरीलपैकी कोणीही नाही' असा पर्याय मतदारांना उपलब्ध करून द्यावा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिला होता.

मतदारांना नकारात्मक मत देण्याचा अधिकार नाकारणे याचा अर्थ घटनेच्या अनुच्छेद १९ (१)(अ) अन्वये नागरिकांना प्रदान करण्यात आलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य तसेच अनुच्छेद २१ नुसार देण्यात आलेले सन्मानाने जीवन जगण्याचा मुलभूत हक्क नाकारणे होय, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्यामुळे निवडणुकीसाठी एकच उमेदवार उभा आहे, म्हणून निवडणूक न घेता त्या उमेदवाराला बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करणे म्हणजे मतदारांना 'वरील पैकी कोणीही नाही' (नोटा) या पर्यायाचा वापर करण्यास प्रतिबंधित करणे असून त्यामुळे मतदारांना असलेल्या नकारात्मक मतदान करण्याच्या मुलभूत हक्काचा भंग होतो. त्यामुळे लोकप्रतिनिधित्व कायद्याचे कलम ५३ (२) रद्द करून निवडणुकीसाठी एकच उमेदवार उभा असला तरी तेथे निवडणूक घेण्याचा आदेश निवडणूक आयोगाला द्यावा, या मागणीसाठी विधी सेंटर फॉर लीगल रिसर्चने याचिका दाखल केलेली असून, त्यावर न्या. सूर्य कांत यांनी त्यासंबंधी आपले अनुकूल मत व्यक्त केलेले आहे.

घटनात्मकदृष्ट्या हे योग्य आहे का, हे पाहणे आवश्यक आहे. नकारात्मक मतदानाचा हक्क हा मुलभूत अधिकार आहे का? मुळात लोकसभेच्या निवडणुकीत गेल्या ३५ वर्षांत केवळ एकच उमेदवार (२०२४ मध्ये) बिनविरोध निवडून आलेला आहे. त्यामुळे भविष्यात त्यामध्ये वाढ होईल,असे गृहीत धरून कोणताही बदल करणे योग्य आहे का?

मतदानाचा अधिकार म्हणजे निवड करण्याचा अधिकार आहे, निवड नाकारण्याचा नाही. निवड करण्याचा प्रश्न दोन किंवा दोनापेक्षा जास्त उमेदवार असतील तरच येतो. मतदानाचा अधिकार हा उमेदवारांमधून आपल्याला योग्य वाटेल अशा उमेदवाराला आपला लोकप्रतिनिधी म्हणून निवडण्याचा लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ द्वारा मतदारांना प्रदान करण्यात आलेला सकारात्मक (नकारात्मक नव्हे) वैधानिक अधिकार आहे. म्हणूनच लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या कलम ५३ (२)मध्ये निवडणुकीच्या रिंगणात एकच उमेदवार असेल तर तेथे निवडणूक न घेता तो उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्याची तरतूद करण्यात आलेली असून ती योग्यच आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या 'वरील पैकी कोणीही नाही' (नोटा) या अधिकारातही दोन अथवा दोनापेक्षा जास्त उमेदवारांपैकी 'कोणीही नाही' असाच अर्थ आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

'नोटा' निवडणुकीच्या निकालावर प्रत्यक्षात कोणताच परिणाम करीत नसल्यामुळे तो निरर्थक, परिणामशून्य, कुचकामी व निरुपयोगी आहे. नकारात्मक मते म्हणजे बाद मते. त्यामुळे तो कोणत्याही प्रकारचा अधिकारच नाही, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

मतदान करण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार नसून तो लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ अन्वये मतदारांचा कायदेशीर अधिकार आहे. जर मतदानाचा अधिकार हा कायदेशीर अधिकार असेल तर नकारात्मक मतदान हा मुलभूत अधिकार कसा? आपल्याकडे गुप्त मतदान पद्धत असल्यामुळे मतदाराने कोणत्या उमेदवाराला मत दिले, हे समजत नाही, त्यामुळे घटनेच्या अनुच्छेद १९(१) (अ) मध्ये अभिप्रेत असलेले असे ते अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही. मूलभूत अधिकार हे व्यक्तिगत अधिकार असतात , सामूहिक नव्हे. मुळात घटनेने प्रदान केलेले मूलभूत अधिकार हे सर्व नागरिकांना प्रदान केलेले आहेत. त्यामुळे घटनेच्या अनुच्छेद १९ (१) (अ) अन्वये बहाल करण्यात आलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य तसेच अनुच्छेद २१ अन्वये प्रदान करण्यात आलेले सन्मानाने जीवन जगण्याचे स्वातंत्र्य हे मूलभूत अधिकार आहेत. परंतु, मतदानाचा अधिकार मात्र १८ वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या नागरिकांनाच आहे. त्यामुळे देशातील काही नागरिकांना मतदानाचा मूलभूत अधिकार आहे व काहींना तो अधिकार नाही. मतदान करण्याचा अधिकार जर मूलभूत अधिकार नसेल तर नकारात्मक मतदानाचा अधिकार हा मूलभूत अधिकार कसा ?

त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात एकच उमेदवार असल्यास तेथे निवडणूक घेण्याची मागणी पूर्णतः चुकीची असून त्यामुळे विधी सेंटर फॉर लीगल रिसर्चची याचिका रद्द करणे आवश्यक आहे. तसेच निवडणुकीच्या रिंगणात जर एकच उमेदवार असेल तर निवडणूक आयोगाने तो उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर न करता त्या मतदार संघात निवडणूक घेऊन त्या उमेदवाराला कायद्याने निश्चित केलेली किमान मते मिळाल्यासच तो निवडून आल्याचे जाहीर करावे, यासाठी अशा उमेदवारांना किमान किती टक्के मते मिळाली पाहिजेत, या संबंधी संसदेने कायदा करावा, असे न्या. सूर्य कांत यांनी व्यक्त केलेले मतही अयोग्य आहे.

कारण मतदारसंघात मोठ्या प्रमाणात उमेदवार उभे असल्यामुळे चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या उमेदवाराला संसदेने कायद्याद्वारे निश्चित केलेल्या किमान मतांपेक्षा कमी मते मिळाली तरी त्याला विजयी घोषित करावयाचे परंतु, निवडणुकीसाठी एकच उमेदवार असल्यास त्याने मात्र किमान मतांपेक्षा कमी मते मिळविल्यास त्याला पराभूत म्हणून घोषित करावयाचे अशी कोणतीही तरतूद घटनेच्या अनुच्छेद १४ चा भंग करणारी ठरेल. (हा लेखाचा स्वतंत्र विषय आहे.) तसेच नकारात्मक मतदानाचा अधिकार हा मुलभूत अधिकार आहे, या २०१३ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावरही पुनर्विचार आवश्यक आहे.

# हा पाऊस कोणता?



**सध्या ना, या पावसाचे काहीच कळेनासे झाले आहे. मध्यंतरी, म्हणजे मे महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात पडलेला पाऊस अवकाळी असावा की वळवाचा असावा यावर आम्ही घरामध्ये घनगंभीर चर्चा केली होती. ती संपता संपता आमच्या मातोश्रींच्या व्हॉट्सॲप नामक ज्ञानप्रसारक केंद्रावर एक ज्ञानांकुर उमटले, की याला 'प्री मान्सून' म्हणजे 'पूर्वमोसमी' म्हणावे. आम्ही या ज्ञानप्रसारक केंद्राचे मोठे भोक्ते आहोत.**

आम्ही सारेच त्यातून उमटणारे विविध ज्ञानकण वेचित असतो. सांप्रत काळी आम्ही गाय आणि म्हैस यांच्या दुधातील गुणात्मक फरक जाणला आहे. असे काही गंभीर विषय आल्यानंतर त्यावर गहन चर्चा होणे आणि त्या मंथनातून आमच्यापुरते का होईना; परंतु नवनीत (पक्षी - लोणी, आम्ही नावाविषयी बोलत नाही आहोत) निर्माण होते. त्याचा आम्ही मनोज्ञपणे यथेच्छ आस्वाद घेतो. आमची ही प्रासादिक वाणी हादेखील मराठी भाषाविषयक आणि काव्य-साहित्यविषयक गटांत आम्ही सक्रिय असल्याचा क्रियाशील पुरावाच आहे. तर हे सारे असो. आता फिरून पुन्हा एकदा मूळ मुद्द्याला येऊ.

तर, मंडळी, हा पाऊस पूर्वमोसमी असावा अशी मान्यता आम्ही कुटुंबीयांनी एकमताने दिलीच होती; तोच चक्क हवामान खात्याने यास मोसमीच ठरवून टाकले. हे म्हणजे असे झाले, की आपण ज्यास 'स्टार्टर' (पक्षी - चखणा) समजावे आणि हाय रे दैवा... तोच 'मेन कोर्स' (पक्षी - जेवण) आहे, असे जाहीर व्हावे. त्यात आपण नंतर चांगला हात मारू या, असे मनाशी ठरवून सुरुवातीला हात आखडता घेतलेला असावा आणि घरी जाऊन पुन्हा गॅस पेटवावा लागणार, या विचाराची ठिणगी पत्नीच्या चेहऱ्यावर पेटावी! आम्हा काहीच समजेना. बरे, पाऊसही सर्वत्र असा काही धो धो बरसला, की याचे नाव ते! यामुळे एक मात्र घडले, सांप्रत काळात जूनच्या शेवटाला किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात रस्त्यांच्या ज्या काही नद्या आणि छोट्या-मोठ्या खड्डयांमध्ये तलाव निर्माण होतात, ते मे महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात निर्माण झाले. आम्ही तरी काय करणार याला, पावसाचेच चुकले.

नेहमीसारखा वेळेत पडला असता, तर आमची खड्डे खणण्याची कामे पूर्ण झाली असती, अशा अर्थाचे खुलासेही लगोलग आले. खरेच, पावसाचे चुकलेच. आम्ही दर वर्षीप्रमाणे गेल्या वर्षी वापरून कपाटातल्या खालच्या कप्प्यात निगुतीने ठेवून दिलेले पर्जन्यवस्त्र (रेनकोट हो) बाहेर काढायच्या आत पाऊस असा काही कोसळला, की वाळत घातलेली वस्त्रे वाळायची राहून गेली आणि जुलैच्या तिसऱ्या-चौथ्या आठवड्यात भिंतींना धरणारी ओल, जूनच्या दुसऱ्या दिवशी दिसू लागली.

हेही मान्य. परंतु एवढे सारे करून सवरून हा पाऊस नामक इसम एखादी व्यक्ती अचानक गायब व्हावी त्याप्रमाणे नाहीसा झाला. मग कोणी तरी पुन्हा एकदा ज्ञानामृताचे सेवन करविले, की तो पूर्वमोसमीच होता. आता म्हणजे पुन्हा एकदा सात जूननंतर मोसमी पावसाला सुरुवात होईल. याला काय म्हणावे बरे? आम्ही तर बुचकळ्यातच पडलो. म्हटले, तुम्ही एक काय ते ठरवून घ्या. बाहेर काढलेले पर्जन्यवस्त्र बाहेरच ठेवायचे आहे, की पुन्हा कपाटात, याचा निर्णय आम्ही घ्यावा की नाही? की, पुन्हा एकदा आमच्या व्हॉट्सॲप ज्ञानप्रसारक केंद्रावर उमटलेल्या ज्ञानबिंदूत म्हटल्याप्रमाणे, 'यंदा पाऊस आपल्याकडून केरळकडे आणि तिकडून अंदमानात जाणार आहे' असे घडणार आहे? तसे जर घडणार असेल, तर तिकडून यू टर्न घेऊन येण्यास त्याला किती काळ लागणार आहे? प्रश्न बरेच आहेत आणि बाहेर ढगही दाटून आले आहेत. आज सायंकाळी जर पडला, तर तो कोणता पाऊस होता, हा प्रश्न त्यात महत्त्वाचा आहे.

## चटपटीत मसाला पाव

**साहित्य**– अमूल बटर अर्धी वाटी, दोन मध्यम कांदे बारीक चिरून, दोन मध्यम टोमॅटो बारीक चिरून, दोन टेबलस्पून बारीक चिरलेली हिरवी मिरची, एक टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट, पाव वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन चमचे पाव भाजीचा मसाला, पावभाजीचे पाव, एक चमचा लाल मिरचीचे तिखट, एक चमचा लिंबाचा रस, चवीनुसार मीठ.

**कृती**– तव्यावर अमूल बटर घालून गरम करून घ्या व त्यात बारीक चिरलेला कांदा घालून तो मऊ होईपर्यंत परता. मग त्यात आलं-लसणाची पेस्ट घालून दोन मिनिटे परतून घ्या. नंतर पाव भाजीचा मसाला घालून पुन्हा दोन मिनिटे परता. आता त्यात बारीक चिरलेले टोमॅटो व लाल मिरचीचे तिखट घालून टोमॅटो मऊ होईपर्यंत परता. मग हिरव्या मिरच्यांचे बारीक चिरलेले तुकडे घालून ते कुरकुरीत होईपर्यंत परता आता पावाच्या दोन्ही बाजूला (बाहेरून आणि आतून) बटर लावून दोन्ही बाजू भाजून घ्या.

नंतर आतील बाजूला आपण तयार केलेला मसाला सगळीकडे पसरून लावा. मसाला लावलेला पाव तव्यावर ठेवून डावाने सारखा दाबत राहून हलका भाजून घ्या. याच पद्धतीने सगळे पाव मसाल्याचे तयार करून घ्या. गरम मसाला पाव पुदिन्याच्या चटणी सोबत सर्व्ह करा.



## चेहरा आरोग्याचा आरसा

**आपली त्वचा हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. त्यातल्या त्यात चेहऱ्याची त्वचा आपले आरोग्य कसे आहे हे दर्शवीत असते. जुन्या काळातील आयुवेर्दासारख्या सगळ्या जुन्या उपचार पध्दतींनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. चीनमध्ये लोकप्रिय असलेल्या ॲक्युपंक्चर किंवा ॲक्युप्रेशर अशा जुन्या उपचार पध्दतीत सुध्दा चेहरा बघून आरोग्याचे निदान केले जाते.**

**आयुर्वेदामध्ये** जशी नाडी परीक्षा आहे. तेवढी ही चेर्हयाची परीक्षा शास्त्रशुध्द आणि नेमकी नाही. परंतु आरोग्याच्या काही तक्रारींचा अंदाज चेर्हयाच्या त्वचेवरून येतो असे अनेक अनुभवी डॉक्टर आणि वैद्यांचे म्हणणे आहे. आपल्या शरीरातल्या अवयवांमध्ये जे काही घडते त्याची प्रतिक्रिया चेर्हयावर उमटते आणि चेर्हयावरून जे दिसते त्याचाच विस्तार शरीरातल्या अवयवांमध्ये झालेला असतो असे चिनी लोक मानतात.

आधुनिक काळातले त्वचारोग तज्ञ देखील त्वचेवरच्या विविध डागांवरून रुग्णाच्या कोणत्या अवयवात काय बदल झालेले आहेत हे हेरता येते असे मान्य करत आहेत. काही डॉक्टरांनी तर चेर्हयावरचा कोणता बदल शरीरातल्या कोणत्या दोषाचा द्योतक आहे याचे काही ठोकताळे बसवलेले आहेत. तोंडामध्ये होणारे बदल किंवा दिसणारे दोष हे पोटातल्या विकाराचे द्योतक असतात. अपचन झालेल्या रुग्णाच्या तोंडाला दुर्गंध येतो. पोटातल्या काही विकारांचे प्रतिबिंब तोंड येण्यात उमटत असते. मूत्रपिंड आणि मूत्राशय यात काही दोष असतील तर ते दोष हनुवटीवर उमटतात. त्याच बरोबर लिव्हरमध्ये काही दोष असेल तर पापण्यामध्ये बदल होतात. काही लोकांना या गोष्टी मान्य नाहीत परंतु शेवटी हे ठोकताळे आहेत.





काही लोकांच्या चेर्हयावर मानेच्या मागे त्वचा ङ्किकट पडायला लागते तेव्हा काही विशिष्ट आजार बळावत असतात. काही लोकांच्या चेहऱ्यावरच्या काही बदलांतून अनेक डॉक्टरांना तो मधुमेहाला बळी पडण्याची शक्यता लक्षात येते. चेहऱ्यातले काही बदल विशेषतः कानाच्या मागचे बदल हे रुग्ण ज्यादा अन्न प्राशन करत असल्यचे द्योतक असते असे काही डॉक्टरांच्या लक्षात आले आहे.

सतत पैशाच्या मागे लागणारे लोक, दारू पिणारे लोक, रक्तदाब वाढलेले लोक चेर्हयावरून सरळ सरळ ओळखू येतात मात्र त्यासाठी अनुभवी नजर लागते.

## पपई खाण्याचे १० आरोग्यदायी फायदे!

**चवीला गोड, शरीराला पोषक आणि त्वचेचे आरोग्य सुधारणारे फळ म्हणजे पपई! पपई शरीराला गरम असल्याने वातावरणात गारवा असताना खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाण्याचे आणखी दहा फायदेदेखील आहेत....**

▮ **शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करते**– पपईमध्ये व्हिटामिन सी व फायबरचे प्रमाण अधिक असल्याने रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहण्यापासून बचाव होतो. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहिल्याने हृद्यविकाराचा धोका संभवतो.

▮ **वजन घटवण्यास मदत होते**– एका मध्यम आकाराच्या पपईमध्ये 120 कॅलेरीज असतात. त्यामुळे जर तुम्ही वजन घटवण्याच्या विचारात असाल तर पपईचा आहारात नियमित समावेश करा. पपईतील डायटरी फायबर्समुळे वेळी-अवेळी लागणाऱ्या भूकेवर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

▮ **रोगप्रतिकारशक्ती वाढते**– आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे फार गरजेचे आहे. तसेच शरीरातील व्हिटामिन सीच्या गरजेपेक्षा 200% अधिक व्हिटामिन सी केवळ पपईमुळे मिळू शकते.

▮ **मधुमेहींसाठी गुणकारी**– पपई चवीला गोड असली तरीही त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. कपभर पपईच्या तुकड्यांमधून केवळ ८.३ ग्रॅम साखर असते. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाल्ल्याने मधुमेह जडण्यापासून बचाव होतो.

▮ **डोळ्यांचे आरोग्य सुधारते**– पपईमध्ये व्हिटमिन ए मुबलक प्रमाणात आढळते. डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी व्हिटामिन ए अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून बचावण्यासाठी पपईचा आहारात समावेश करावा.

▮ **सांधेदुखीपासून आराम मिळतो**– पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.

▮ **पचन सुधारते**– आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूड किंवा बाहेरचे जेवण टाळणे हे काहीसे कठीण आहे. त्यामुळे अशा खाण्याने पचनशक्ती बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पपई खाल्ल्याने अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते. पपईतील पपैन नामक एंजाईम पचन कार्य सुधारते.

▮ **मासिक पाळीचा त्रास कमी होतो**– अनियमित मासिक पाळी तसेच मासिक पाळीच्या काळातील त्रास अशा समस्या दूर करण्यासाठी पपई फारच उपयुक्त आहे.


▮ **कर्करोगापासून बचाव होतो**– पपईमधील ॲन्टीऑक्सिडंट घटक शरीरातील फ्री रॅडीकल्सपासून तुमचा बचाव करते. तसेच पपईतील बीटा कॅरोटीन आतड्यांच्या कर्करोगापासून बचाव करते.

▮ **ताण-तणाव कमी होतो** – दिवसभराच्या धावपळीनंतर वाटीभर पपईचे काप खाल्ल्यास थकवा कमी होण्यास मदत होते. तसेच व्हिटामिन सी शरीरातील हार्मोन्सचे प्रमाण संतुलित राखते.



## आता डेस्कटॉपवरून करा व्हॉट्सऍप व्हिडिओ आणि ऑडियो कॉल

**व्हॉट्सऍप कंपनी आपल्या यूजर्ससाठी नेहमीच नवीन फीचर्स आणते. आता कंपनी नवीन फीचर्स वर काम करीत आहे. व्हॉट्सऍप यूजर्सला आता डेस्कटॉपवरून सुद्धा कॉल करता येणार आहेत. या कॉलमध्ये ऑडियो आणि व्हिडिओचा समावेश असेल.**



**व्हॉट्सऍप** ने डेस्कटॉपसाठी अनेक फीचर्स आणले आहेत. परंतु, दोन फीचर्सची कमतरता अजूनही जाणवत आहे. पहिले आहे डेस्कटॉप वर व्हॉट्सऍप कॉल करणे आणि दुसरे डेस्कटॉपवर व्हिडिओ किंवा किंवा ऑडियो करणे. यातील एका फीचरची कमतरता आता जाणवणार नाही. खरं म्हणजे व्हॉट्सऍप ने विंडोजसाठी एक नवीन ऍप आणला आहे. हा ऍप वेगाने लोड होते. तसेच सहज इंटरफेस सोबत येते. याच्या मदतीने व्हॉट्सऍप आपल्या यूजर्सला जास्तीत जास्त ८ लोकांसोबत ग्रुप व्हिडिओ कॉल आणि ३२ लोकांसोबत ऑडियो कॉल करण्याची सुविधा देते.

**मैक ओएस ला ही सुविधा मिळणार**

समोर आलेल्या माहितीनुसार, फक्त विंडोजचा यात समावेश करण्यात आला आहे. परंतु, हे फीचर मॅकबॅकच्या यूजर्ससाठी उपलब्ध केले जाणार आहे. कारण, सध्या मॅक डेस्कटॉप व्हर्जन बीटा टेस्टिंग मध्ये आहे. नुकत्याच एका ब्लॉग पोस्टमध्ये मेटाने म्हटले की, विंडोजच्या इंस्टंट मेसेजिंग ऍप व्हॉट्सऍपला नवीन फीचर्स सोबत एक नवीन लूक मिळाले आहे. मेटाने म्हटले की, आम्ही विंडोजसाठी एक नवीन व्हॉट्सऍप ऍप आणले जात आहे. जे वेगाने लोड होईल. या ऍप सोबत मोबाइल व्हर्जनच्या सारखे इंटरफेस सोबत येईल.

**डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप कॉल कसा कराल?**

डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप च्या माध्यमातून व्हिडिओ किंवा ऑडियो कॉल करण्याची सुविधा अपडेट सोबत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला डेस्कटॉप व्हॉट्सऍप ऍपला अपडेट करावे लागणार आहे. अपडेट करण्यात आल्यानंतर तुम्हाला मोबाइल इंटरफेस प्रमाणे व्हिडिओ कॉल आणि ऑडियो कॉलचे आयकॉन दिसेल.

## पोळीला तूप लावून खाणे आरोग्यास लाभदायक



**हेल्दी** राहण्यासाठी शरीरास सकस आहाराची फार गरज असते. आताच्या काळात सर्वांना फास्ट फूड जास्त आवडतात, त्यामुळे रोजच्या आहाराकडे दुर्लक्ष होते. फास्ट फूड आणि तेलकट पदार्थ आरोग्यास घातक असतात. कित्येक लोक पोळ्या बनवण्यासाठी तेल किंवा डालड्याचा उपयोग करतात. तर पोळ्या बनवण्यासाठी तूपाचा वापर शरीरास अधिक लाभदायक आहे. तूपामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्वे असतात. तुम्हाला वाटत असेल, तूप खाल्याने वजन वाढतं तर हा एक गैरसमज आहे.

▮ वजन कमी करण्यासाठी तूपाची मदत होते.

▮ तूप आपल्या शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

**त्वचेसाठी लाभदायक तूप**

तूपामध्ये एन्टीऑक्सीडेंट घटक असतात ते त्वचेसाठी फार फायदेशीर असतात. त्याचप्रमाणे त्वचेमध्ये असलेले डेड सेल्स तूपाच्या नियमित सेवनाने नष्ट होतात.

## त्वचेच्या संसर्गापासून मुक्ती मिळवण्यासाठी घरगुती उटणे



**साहित्य :**

**एक** वाटी मसूर डाळीचे पीठ, कच्चे तांदूळ एक चतुर्थांश कप, आठ बदाम, अर्धा कप गव्हाचा सांजा, चिमूटभर हळद, गुलाबपाणी

**कृती व वापरण्याची पद्धत**

▮ मसूर डाळ, तांदूळ आणि बदाम बारीक वाटून त्याची पूड तयार करा. ▮ या पावडरमध्ये गव्हाची भरड आणि हळद घाला. ▮ या मिश्रणात पाणी किंवा गुलाबपाणी घालून पेस्ट बनवा. ▮ ही पेस्ट चेहरा, मान आणि हातावर लावा.

▮ वाळल्यावर पाण्याने धुऊन घ्या. ▮ आठवड्यातून एकदा या उटण्याचा वापर करावा.

**हे कसे कार्य करते?**

त्वचेच्या सौंदर्यवर्धनासाठी प्राचीन काळापासून उटण्यांचा वापर केला जात आहे. हे त्वचेवरील घाण दूर करण्यास मदत करतं. हळदीत आढळणाऱ्या अँटिसेप्टिक गुणधर्मामुळे त्वचेचं संसर्गापासून संरक्षण होतं. बदाम त्वचेचं पोषण करून रंग उजळण्यास मदत करतो.

## ...तर तुमचा टॉवेल बनू शकतो तुमच्या त्वचेचा शत्रू

**अंघोळ केल्यानंतर मिळणारा फ्रेशनेस कशातच नाही. दिवसातून किमान एकदा तरी आपण अंघोळ करतो. अंघोळ केल्यानंतर अंग पुसण्यासाठी आपण टॉवेलचा उपयोग करतो. तुम्ही वापरत असलेला टॉवेल तुमचे शरीर पुसण्याचे काम करतो, पण याशिवाय तुमच्या शरीरावरील मळ काढण्यासही मदत करतो. पण जर तुम्ही तुमच्या टॉवेलची योग्य काळजी घेतली नाही तर मात्र हाच टॉवेल तुमच्या त्वचेचा शत्रू बनू शकतो. आज आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक माहिती देणार आहोत. त्यामुळे तुम्हीही टॉवेल कसाही वापरत असाल तर हे नक्की वाचा.**

**टॉवेलची स्वच्छता**

काही जणांना टॉवेल सतत धुण्याची गरज नसते, असे वाटते. तुम्ही असा विचार करत असाल तर तो अगदीच चुकीचा आहे. कारण तुम्ही अंघोळ केल्यानंतर तुमच्या शरीरावर साचलेला मळ काढला जातो. त्यामुळे साहजिकच तुमचा मळ टॉवेलवर साचतो. अशावेळी जर तुम्ही हा टॉवेल सतत वापरत राहिलात तर तुमच्या त्वचेवरही मळ साचत राहील. त्यामुळे तुम्हाला स्वच्छ करणाऱ्या टॉवेलची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा टॉवेल धुणे अपेक्षित असते. जर तुमचा टॉवेल पातळ असेल तर तुम्ही तो रोज धुतला तर फारच उत्तम.

**आता आली फेकून देण्याची वेळ**

टॉवेल कितीही चांगला वाटत असला तरी त्याला वापरण्याचीही काहीतरी मर्यादा आहे. तुम्ही वर्षानुवर्षे एकच टॉवेल वापरू शकत नाही. तुम्हाला कालांतराने टॉवेल फेकण्याचीही गरज असते. तुम्ही कॉटन किंवा टर्किश कोणताही टॉवेल वापरत असाल तरीदेखील तुम्ही हा टॉवेल सहा महिन्यांनी काढून टाकायला हवा. जास्तीत जास्त सहा महिने आणि कमीत कमी ३ महिने तुम्ही टॉवेल वापरायला हवा.

**टर्किश की कॉटन टॉवेल**

तुमची त्वचा ही फारच नाजूक असते. कोणतेही कॉस्मेटिक वापरताना तुम्ही अगदी पारखून सगळ्या गोष्टी तपासता. पण मग टॉवेलबाबतीत का नाही? तुम्हाला लवकर वाळणारा टॉवेल हवा असेल तर तुम्ही पंचा किंवा पातळ टॉवेलची निवड करा. जर तुम्हाला मऊ असा टॉवेल हवा असेल तर तुम्ही टर्किश टॉवेलचा वापर करा. आता तुमच्या आवडीवर टॉवेलची निवड अवलंबून आहे.

**सूर्यप्रकाश महत्त्वाचा**

अनेकांना टॉवेल वाळत घालण्याचा कंटाळा असतो. पण तुमच्या टॉवेलसाठी सूर्यप्रकाश महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही तुमचा टॉवेल सूर्यप्रकाशात वाळत घालायला हवा. कारण जर त्या टॉवेलवर काही जंतू असतील आणि तुम्हाला टॉवेल धुणे शक्य नसेल अशावेळी कडकडीत उन्हात टॉवेल ठेवल्यामुळे त्यावरील जीवाणू कमी होतात.



**एकट्याने वापरण्याची गरज**

शेअरिंग-केअरिंगमध्ये तुम्ही एकाच टॉवेलचा दोन ते तीन जण वापर करत असाल तर ते तुमच्या त्वचेसाठी फारच वाईट आहे. कारण दोन ते तीन जणांनी एकच टॉवेल वापरला तर तुम्हाला संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही कधीही एकच टॉवेल दोन ते तीन जणांमध्ये वापरू नका. तुम्हाला त्वचा विकार जडण्याची शक्यता यामध्ये अधिक असते. आता तुम्हाला टॉवेल हा अंघोळीपुरता वाटत असला तरी त्याचे महत्त्व काय ते नक्कीच कळलं असेल, त्यामुळे यापुढे याची अधिक खबरदारी घ्या.



## जास्त मीठ खाल्ल्याने होऊ शकतो मधुमेह



**मधुमेहापासून** स्वतःला दूर ठेवायचे असेल तर केवळ साखर खाणे सोडून चालणार नाही. कारण, नुकत्याच करण्यात आलेल्या एका नव्या संशोधनानुसार जास्त मीठ खाणेही बनू शकते मधुमेहाचे कारण. संशोधकांच्या मते जास्त मीठ म्हणजे सोडियम खाल्ल्याने उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते.

मात्र, आता नव्या संशोधनामुळे जास्त मीठ खाणे हे कारण मधुमेह हा आजार होण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते. लिस्बनमध्ये आयोजित युरोप असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ डायबेटिसच्या वार्षिक बैठकीत यासंबंधी माहिती देण्यात आली. जे लोक दिवसभरात २.५ ग्रॅमपेक्षाही जास्त मीठ खातात, त्यांना टाइप २ डायबेटिसचा धोका ४३ टक्क्यांहून अधिक असतो. तसेच शरीराच्या आवश्यकतेपेक्षा ७.३ ग्रॅम जास्त मीठ खात असाल, तर टाइप २ डायबेटिसचा धोका वाढून तो ७२ टक्क्यांवर पोहोचतो.

## शरीरासाठी अतिशय घातक आहे साबुदाणा

### उपवास, व्रत-वैकल्यांसाठी वापरण्याआधी जाणून घ्या गुणधर्म



**हिंदू** धर्मासह इतरही धर्मांत अनेक सण-उत्सव, व्रत-वैकल्ये केली जातात, उपवास ठेवले जातात. यामध्ये एक समान गोष्ट असते ती म्हणजे उपवासाचे पदार्थ. उपवासादरम्यान जवळजवळ सर्व घरांत हमखास वापरण्यात येणारा पदार्थ म्हणजे साबुदाणा. तसाही साबुदाणा पूर्ण वर्षात विविध कारणांनी वापरला जातो, अनेक ठिकाणी साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडे हे नाश्त्याचे पदार्थ म्हणून त्याला पसंती दिली जाते. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारा साबुदाणा आपल्या शरीरासाठी लाभदायक आहे का, याचा कधी विचार केला आहे?

**साबुदाणा शरीरासाठी आहे अतिशय घातक, तुम्हीच पाहा कारणे –**

▮ साबुदाण्याचा जन्म हा इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स या देशांत झाला. साबुदाणा हा सागो झाडांपासून कृत्रिमरीत्या तयार केला जातो. यामध्ये कर्बोदकांचे प्रमाण अतिशय जास्त आहे, त्यामुळे वजन वाढण्यासाठी हा कारणीभूत ठरू शकतो.

▮ १०० ग्रॅम साबुदाण्यामध्ये मध्ये ९४ ग्रॅम कर्बोदके, ०.२ ग्रॅम प्रथिने, ०.५ ग्रॅम तंतुमय घटक व फक्त १० ग्रॅम कॅल्शिअम असते. यावरून लक्षात येते की शरीरासाठी (वजन वाढवण्याखेरीज) तसा या पदार्थाचा काहीच उपयोग नाही.

▮ साबुदाण्यापासून पदार्थ बनवण्यासाठी त्यात जे पदार्थ वापरले जातात, त्यामध्ये बटाटा, शेंगदाणे कुट व इतर काही घटकांचा समावेश असतो. हे घटक पचायला अतिशय जड असतात यामुळे पित्त वाढणे, पोट फुगणे, पोट दुखणे, भूक मंदावणे अशा समस्या उद्‌भवतात.

▮ साबुदाणा आतड्यातील सर्व द्राव शोषून घेत असल्याने आपली मलप्रवृत्ती सुद्धा कठीण होते. तसेच साबुदाण्यामुळे पित्ताचा त्रासही वाढतो.

अशाप्रकारे ज्या दिवशी हलका आणि प्रमाणात आहार घ्यायचा त्याच दिवशी, म्हणजे उपवासाच्या दिवशी आपण साबुदाण्यासारखा जड पदार्थ खाऊन स्वतःच्या शरीराचे नुकसान करून घेत आहोत. त्यामुळे वेळीच सावध व्हा व साबुदाण्याचा जितका हवा तितकाच वापर करा.

**आयुर्वेदानुसार मनुकांमध्ये भरपूर मात्रेत औषधी गुण असतात. आम्हाला रोज ४-५ मनुका खायलाच पाहिजे. मनुकांना सर्दी-खोकला आणि कफ दूर करण्याचे सर्वात उत्तम औषध मानले जाते. त्याशिवाय देखील मनुकांचे बरेच फायदे असतात. त्यात उपस्थित न्यूट्रिएंट्स बऱ्याच आजारांमध्ये फायदेशीर ठरतात. तर जाणून घेऊ रोज मनुका खाण्याचे काय फायदे आहेत...**

## रोज करा ५ मनुकांचे सेवन आणि बघा त्याचे फायदे

▮ मनुका खाल्ल्याने ब्लड सर्क्युलेशन इम्प्रुव्ह होते. यामुळे त्वचेची रंगत वाढते आणि रंग देखील निखरण्यास मदत होते.

▮ मनुकांमध्ये फायबर्स असतात. हे डायजेशन योग्य ठेवण्यास मदत करतात.

▮ यात पोटॅशियमची मात्रा जास्त असते. मनुका हार्ट ॲटॅकच्या आजारांमध्ये इफेक्टिव्ह आहे.

▮ यात आयर्न असतं. हे ॲनिमिया (रक्ताची कमतरता) दूर करण्यास फायदेशीर ठरतात.

▮ यात अँटीऑक्सिडेंट्स असतात. यामुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून बचाव होण्यास मदत मिळते.

▮ यात अँटीबॅक्टेरियल गुण असतात. यामुळे सर्दी-खोकला ठीक होण्यास मदत मिळते.

▮ यात बीटा कॅरोटिन असते, जे डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतं.

▮ यात ऑक्झेलिक ॲसिड असतं. यामुळे दात मजबूत होतात. यामुळे गम प्रॉब्लेमपासून बचाव होतो.

▮ यात कॅल्शियमची मात्रा अधिक असते. म्हणून जॉइंट पेनपासून बचाव होतो.

▮ याचे सेवन केल्याने बॉडीचे टॉक्सिन्स दूर होऊन हेअर फॉलची समस्या देखील दूर होते.



**मनुका खाण्याचे हेल्दी मार्ग**

▮ कब्ज दूर करण्यासाठी रात्री पाच मनुका आणि एक लसणाची कळी खायला पाहिजे.


▮ मनुकांत मध मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

▮ याला दुधात उकळून त्याचे सेवने केल्याने देखील फायदा होतो.

▮ मनुकांमध्ये बडिशेप आणि ओवा मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार ३ टप्प्यात
# पुरेशा 'ईव्हीएम मशीन'चा अभाव कारणीभूत

■**मुंबई** : पुढील दोन महिन्यांत निवडणुकीशी संबंधित तयारी राज्य निवडणूक आयोगाकडून पूर्ण करण्यात येणार आहे. मात्र, ज्या दिवशी प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडेल त्यादिवशी 'ईव्हीएम मशीन'चा पुरेसा साठा कुठून उपलब्ध करायचा, असा प्रश्न राज्य निवडणूक आयोगाला सतावत आहे. राज्य निवडणूक आयोगाकडे ६५ हजार 'ईव्हीएम मशीन' आहेत. परंतु, राज्यात एकाच दिवशी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १ लाख ५० हजार 'ईव्हीएम मशीन'ची गरज भासणार आहे. त्यामुळे नगर परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या निवडणुका तीन टप्प्यात घेण्याचे नियोजन असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सांगितले.



"गरज असेल तेथेच डॉक्टर
वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टरांची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत यंदा डॉक्टरांचा अधिकचा सहभाग नसेल. परंतु, ज्याठिकाणी गरज आहे त्याठिकाणी डॉक्टर, रुग्णवाहिका तैनात करण्यात येतील."
**- दिनेश वाघमारे (आयुक्त, राज्य निवडणूक आयोग)**

### ऑक्टोबरमध्ये होणार निवडणुका?
प्रभाग रचना ही २०११ च्या जनगणनेनुसार होणार असली तरी सद्यःस्थितीत लोक स्थलांतरित झाले असल्यास काही ठिकाणच्या प्रभागरचनेत बदल होईल, संपूर्ण प्रभाग रचनेसाठी दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. एकूणच निवडणूक प्रक्रिया अंतिम करण्यासाठी तीन ते साडेतीन महिन्यांचा कालावधी लागणार असल्याने ऑक्टोबर महिन्याच्या पंधरवड्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडतील, असे संकेत वाघमारे यांनी दिले. मुंबई महानगरपालिका, जिल्हा पंचायत समिती निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडे ईव्हीएम मशीनची मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील २९ महानगरपालिकेत चार ते पाच वर्षांपासून प्रशासकीय राज आ-हे, तर २४८ नगर परिषदांचीही मुदत संपुष्टात आली असून याठिकाणी प्रशासकाच्या माध्यमातून कारभार सुरू आ-हे. या पार्श्वभूमीवर पुढील चार महिन्यांत निवडणुका घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने १३ मे रोजी राज्य सरकारला दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त होताच राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागणार आहे. विशेष म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दीड लाख ईव्हीएम मशीनची गरज भासणार आहे. परंतु राज्य निवडणूक आयोगाकडे फक्त ६५ हजार ईव्हीएम मशीन उपलब्ध आहेत. निवडणूक आयोगाकडे अतिरिक्त मशीनसाठी मागणी करण्यात येणार आहे. मात्र, मशीन उपलब्ध न झाल्यास तीन टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे नियोजन असल्याचे वाघमारे यांनी सांगितले.

**अशी पार पडणार निवडणूक प्रक्रिया**

प्रभाग रचना, प्रभाग रचनेबाबत हरकती सूचना मागवणे, त्यानंतर सूचना हरकतीवर सुनावणी, त्यानंतर अंतिम प्रभाग रचना अहवाल प्राप्त होईल, त्यानंतर आरक्षण लॉटरी, मतदारयादी तयार करणे आणि प्रत्यक्ष मतदानाचा दिवस या निवडणुकीच्या महत्त्वाच्या प्रक्रिया आहेत.

## शहरात पाऊस आला, पण रस्त्यावरील खोदकाम सुरूच

■**विरार** : वसई-विरार शहरात पावसाचे आगमन झाल्यानंतरही विविध भागांमध्ये सुरू असलेले रस्त्यांचे खोदकाम नागरिकांच्या त्रासाचे कारण ठरत आहे. शहरातील वर्दळीच्या रस्त्यावर चिखल पसरला असल्यामुळे दुचाकी घसरून मोठा अपघात होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. यातच वाहतूक कोंडीचे प्रमाण देखील वाढले आहे.शहरातील मुख्य वर्दळीच्या रस्त्यांवर विविध विकासकामे, ड्रेनेज लाईन टाकणे किंवा पाइपलाइन बदलण्याचे काम सुरू आहे. मात्र, पावसाळ्याच्या तोंडावर ही कामे अपूर्ण राहिल्याने त्या ठिकाणी चिखल आणि पाणी साचत आहे. परिणामी, वाहनधारकांना वाहन चालवताना अडचणी येत असून, दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत.




नागरिकांनी या समस्येकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले असून, पावसाळ्यापूर्वी खोदकाम पूर्ण करावे, अशा मागण्या वारंवार करण्यात येत आहेत. मात्र तरीही काही ठिकाणी कामे संथ गतीने सुरू असल्याचे दिसून येते. स्थानिकांनी प्रशासनावर वेळेआधी नियोजन न केल्याचा आरोप केला आहे. दरवर्षी पावसाळा येतो, तरीही नेहमीप्रमाणे कामे शेवटच्या क्षणीच सुरू होतात. याचा त्रास मात्र आम्हा सामान्य नागरिकांना सहन करावा लागतो, असे एका रहिवाशाने सांगितले.

विरार पूर्वेकडील चंदनसार येथील नैसर्गिक पाणी जाण्यासाठी रस्त्याच्या मधोमध खोदकाम करून उघाडीचे काम सुरू आहे. मात्र, मागील दोन महिन्यांपासून काम संथ गतीने चालत सुरू आहे. याशिवाय, खोदकामामुळे रस्त्यांचे रुंदीकरण कमी झाल्याने वाहतूक कोंडीचे प्रमाणही वाढले आहे. याचा थेट फटका सामान्य नागरिकांपासून कामावर जाणाऱ्या सर्वांनाच बसत आहे.

महापालिका प्रशासनाने यासंदर्भात लवकरात लवकर ठोस पावले उचलून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सध्या सर्वत्र होत आहे. याबाबत पालिकेचे अभियंता प्रदीप पाचंगे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी कोणतेही उत्तर दिलेले ना-ही. यामुळे त्यांची भूमिका मांडता आलेली नाही.

## कल्याणमधील धोकादायक इमारतीत शासकीय कामकाज सुरू

■**डोंबिवली** : कल्याणमधील सप्तश्रृंगी इमारतीचा स्लॅब कोसळून सहा जणांचा मृत्यू झाल्यानंतर पालिका प्रशासनाने खडबडून जाग आली. धोकादायक इमारतींवर कारवाईला सुरुवात केली. मात्र, डोंबिवली पश्चिमेकडील पु. भा. भावे सभागृह ही इमारत अतिधोकादायक ठरवली असतानाही, येथे महसूल विभागाचे मंडळ अधिकारी कार्यालय आणि तलाठी कार्यालय सुरूच आहे. त्यामुळे येथे येणारे नागरिक आणि अधिकारी दोघांचाही जीव धोक्यात आहे.

या धोकादायक इमारतीत ठाकुर्ली, नवगाव, डोंबिवली, पाथर्ली, आयरे, भोपर, गावद-वी, काटई, संदप, उसरघर, कांचनगाव, कोपर आणि जुनी डोंबिवली या गावांचे ग्राम महसूल अधिकारी कार्यरत आहेत. यामुळे येथे नियमितपणे नागरिकांची वर्दळ असते. याच पार्श्वभूमीवर तहसीलदार सचिन शेजाळ यांनी महापालिकेला पत्र देऊन या कार्यालयांसाठी सुरक्षित पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे.



महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे प्रदेश सचिव संतोष केणे, प्रणव केणे आणि राहुल केणे यांनी ५ जून रोजी या इमारतीची पाहणी केली. त्यांनी मंडळ अधिकारी रविंद्र जमदारे व तलाठी कासार यांच्याशी चर्चा करून कर्मचाऱ्यांची माहिती घेतली. कर्मचाऱ्यांनी नवीन आणि सुरक्षित ठिकाणी कार्यालय स्थलांतरित करण्याची मागणी केली.

या इमारतीबाबत 'ह' प्रभाग क्षेत्रीय सहाय्यक आयुक्तांना आधीच पत्र पाठवण्यात आले असून, प्रशासनाने तत्काळ निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांचे आणि नागरिकांचे प्राण वाचवावेत, अशी संतोष केणे यांनी मागणी केली आहे. धोकादायक खासगी इमारती रिकाम्या करण्यावर भर दिला जात असला तरी, शासकीय इमारतींकडे दुर्लक्ष होत असल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली. दुर्घटना होण्याआधीच कारवाई व्हावी, अशी स्पष्ट भूमिका काँग्रेसकडून मांडण्यात आली आहे.

## विरार पूर्वेकडील रखडलेल्या कामांमुळे रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे

■**विरार** : विरार पूर्वेकडील नारंगी बायपास रस्त्यावर मागील पाच वर्षांपासून उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू आहे. मात्र रखडलेल्या कामांमुळे या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे वाहन चालकांना तारेवरची कसरत करून वाहने चालवावी लागत आहेत. वसई- विरार शहरात दोन दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने शनिवारी सकाळपासूनच बरसण्यास सुरुवात केली होती. यामुळे शहराच्या विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. यातच नारंगी बायपास या रस्त्यावर उड्डाणपुलाचे बांधकाम रखडल्यामुळे या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे या खड्ड्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. या साचलेल्या पाण्यातून वाहन चालकांना रस्त्याचा अंदाज न आल्यामुळे दुचाकी वाहनांचा अपघात होऊ लागला आहे.



**कुठे पडलेत खड्डे :** विरार पूर्व नारंगी बायपास रोड, चंदनसार रोड, साईनाथ रोड, नारंगी गावमार्ग.

"हा रस्ता निसरडा झाल्यामुळे जीवघेणा ठरू लागला आहे. यामुळे रस्त्यावर खडी टाकून खड्डे भरण्यात यावेत. जेणेकरून जीवितहानी होणार नाही."
**-संदेश तांबे - सामाजिक कार्यकर्ता**

नारंगी बायपास रस्ता हा विरार पश्चिमेकडे तसेच मुंबई -अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा रस्ता आ-हे. त्यामुळे या रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडल्यामुळे वाहतूक कोंडी देखील होत असते. यामुळे परिसरात राहणाऱ्या नागरिकांना या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. तासंतास रस्त्यावर वाहतूक कोंडी झाल्यामुळे वाहनचालक देखील हैराण झाले आहेत. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांची डागडुजी करावी, अशी मागणी आता वाहन चालकांनी केली आहे.

नालासोपारा मतदारसंघाचे आमदार राजन नाईक यांनी या उड्डाणपुलाच्या कामाची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी संबंधित अधिकार्यांना धारेवर धरत काम जलद गतीने करण्याचे आदेश दिले होते. मात्र, अधिकार्यांनी आमदारांच्या आदेशालाच केराची टोपली दाखवली असल्याचे दिसू लागले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे उड्डाणपुलाच्या बाजूने वाहने सुरळीत निघण्यासाठी दोन्ही बाजूने रस्ते चालू करणे गरजेचे आहे. असे होत नसल्यामुळे नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यात मोठ मोठे खड्डे पडले आहेत. त्यातच रस्त्यात चिखल पसरलेला आहे. यामुळे वाहने चालवणे जिकिरीचे ठरत आहे. त्यामुळे वाहनावर नियंत्रण सुटून अपघात होऊ शकतो, असा अंदाज वाहन चालकांनी वर्तवला आहे.

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडून चेंडू पुरातत्व विभागाच्या कोर्टात

■**कल्याण** : कल्याणातील इतिहास कालीन दुगार्डी किल्ल्याची संरक्षक भिंत बुधवारी पहाटे झालेल्या पावसात कोसळल्याची घटना घडली. या पुरातन ऐतिहासिक ठेव्याची जबाबदारी आपल्या अंगावरून झटकण्यात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभाग यांची जुंपली असल्याचे यानिमित्ताने समोर आले आ-हे. सरकारी असलेल्या दोन्ही विभागाची टोलावाटोली पाहता, या दुर्घटनेला जबाबदार कोण, असा प्रश्न आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या आरमारांची मुहूर्तमेढ कल्याणमधील दुगार्डी किल्ला येथे रोवली. त्यामुळे ऐतिहासिक महत्त्व असलेले किल्ले दुगार्डी हे लाखो शिवभक्तांचे श्रद्धा स्थान असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कोट्यवधी रुपये खर्च करून किल्ल्याची डागडुजी तसेच बुरुजाचे, कमानीचे काम सुरू आहे. अशातच किल्ल्याच्या समोरील बाजूस असलेली संरक्षक भिंत अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसात बुधवारी पहाटे कोसळली. कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी अधिकारी, ठेकेदार यांना हलगजीर्बाबत खडे बोल सुनावले. तर गुरुवारी खासदार सुरेश म्हात्रे यांनी दुगार्डी किल्ल्याच्या भिंतीच्या ढासळलेल्या भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी ठेकेदारावर कारवाईची मागणी केली. ते म्हणाले, या दुर्घटनेत पुरातन ऐतिहासिक ठेव्याची निगा राखण्याविषयीची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभागाकडून सुरू आहे.



सार्वजनिक बांधकाम विभागाने उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी कल्याण यांना याविषयी पत्र दिले आहे. या पत्रात कल्याण येथील दुगार्डी किल्ल्याच्या भोवती बांधण्यात आलेली संरक्षण भिंत कोसळल्याबाबत संरक्षण भिंतीचे काम हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेले नाही. हे काम पुरातत्व विभागाकडून करण्यात आले आहे.

त्यामुळे या कोसळलेल्या संरक्षण भितीबाबत या विभागाकडून कोणतीही कार्यवाही होणे क्रमप्राप्त होत नाही. हे आपल्या माहितीसाठी आणि पुढील उचित कार्यवाहीसाठी स्पष्ट केले जात आहे. अशा आशयाचे पत्र उपविभागीय अधिकारी सा. बां, उपविभाग क्रमांक कल्याण यांनी पुरातत्व विभागाला दिले आहे.

## ठाण्यातील रस्ते खड्ड्यांच्या गर्तेत... ठाणेकर स्मार्ट रस्त्यांच्या प्रतीक्षेत

■**ठाणे** : ठाणे शहर स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र मोठमोठे टॉवर, मेट्रोच्या उपक्रमातून दिसून येत आहे. मात्र स्मार्ट शहराचे रस्ते खड्ड्यात अडकल्याचे वास्तव पहावयास मिळत आहे. ठाण्यातील खड्ड्यांची समस्या प्रत्येक पावसात निर्माण होते आणि त्यावर तात्पुरते डांबराचा अन्यथा मास्टिक अस्फाल्टचा लेप लावून झाकूण टाकले जाते. यामुळे स्मार्ट शहराचे रस्ते कधी स्मार्ट होणार? याची प्रतीक्षा ठाणेकर करत आहेत.

ठाणे शहरातील मुख्य रस्ता असलेल्या घोडबंदर रोडची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे. कासारवडवली, वाघबीळ, माजिवडा, ओवळा आदी ठिकाणी रस्त्याच्या मधोमध भलेमोठे खड्डे पडले असून हा रस्ता अक्षरशः खड्ड्यांच्या गर्तेत अडकल्याचे पहावयास मिळत आहे. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. ठाण्यात पावसाची सुरुवात होताच रस्त्यांची दुरवस्था उघड होण्यास सुरुवात होते आणि यंदाही त्याला अपवाद राहिला नाही. यंदा अवकाळी पावसाने आधीच हजेरी लावल्याने रस्त्यांची दयनीय अवस्था लवकर उजेडात आल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.



### दर पावसाळ्यात आश्वासनांचे मलम
स्मार्ट सिटी ही संकल्पना केवळ विकासकामांच्या घोषणांमध्ये अडकली आहे. मेट्रोचे खांब उभे राहात आहेत, बुलेट ट्रेनच्या स्वप्नांची चर्चा रंगते आहे, पण सामान्य ठाणेकराला आजही रस्त्यावरील खड्डे चुकवतच आपला प्रवास पार करावा लागतोय. प्रत्येक पावसाळ्याच्या तोंडावर आश्वासनांची सरबत्ती होते. "यंदा खड्डेमुक्त ठाणे" पण प्रत्यक्षात ठाणेकरांचा प्रवास खड्डे चुकवत होत असतो. रस्त्यांचे काम करताना तात्पुरत्या डांबराच्या थराने खड्डे बुजवले जातात. दोन पावसांनंतर हे थर उखडून पुन्हा पूर्ववत खड्डे समोर येतात. हे दृश्य ठाणेकरांना दरवर्षी नव्याने बघावे लागते. शहरातील विकासाचे दावे करणारे नेते, मात्र या समस्यांकडे फक्त आश्वासनांचे मलम लावून फुंकर मारतात. घोडबंदर रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रशासनाची आणि राजकीय नेत्यांची उदासीनता स्पष्टपणे दिसते.

ठाणे शहर स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करत असल्यामुळे ठाण्यात मोठमोठे टॉवर, मेट्रो, सुशोभीकरणाकडे राजकीय नेत्यांनी तसेच प्रशासनाने लक्ष केंद्रित झाले आहे. मात्र या सगळ्या देखाव्याच्या मागे ठाणेकरांच्या मूलभूत गरजांकडे विशेषतः रस्त्यांच्या दुरुस्तीच्या प्रश्नांकडे केवळ दुर्लक्षच होत आहे.

प्रत्येक पावसाळ्याच्या सुरुवातीला पालिका आणि नेते यंदा खड्डेमुक्त ठाणे होईल, असे आश्वासन देतात. मात्र प्रत्यक्षात पावसाळा संपेपर्यंतही रस्त्यांवरील खड्डे कायम राहतात. त्यामुळे या खड्ड्यांतून प्रवास करणे हे ठाणेकरांसाठी नेहमीचे झाले आहे. या खड्ड्यांची दुरुस्ती करताना तात्पुरता डांबर अथवा मास्टिकचा लेप लावून काम उरकले जाते.

प्रत्येक पावसाळ्याच्या सुरुवातीला यंदा ठाणेकरांचा प्रवास खड्डेमुक्त होणार अशी दिवास्वप्ने पालिका आणि नेते दाखवत असतात मात्र प्रत्यक्षात पूर्ण पावसाळा गेला तरी खड्ड्यातून प्रवाशांची सुटका काही केल्या होत नसल्याची खंत प्रत्येक जण व्यक्त करत असतो.

**कृतिशील पावले उचलण्याची गरज**

शहराच्या विकासासाठी सौंदर्यीकरण महत्त्वाचे असले तरी नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या रस्ते, पाणी, वाहतूक या मूलभूत सुविधा अधिक महत्त्वाच्या आहेत. प्रशासन आणि राजकीय नेत्यांनी केवळ बॅनरबाजी आणि घोषणा न करता खऱ्या अर्थाने ठाणेकरांच्या व्यथा समजून घेऊन त्या दूर करण्यासाठी कृतीशील पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा "खड्डेमुक्त ठाणे" ही घोषणा केवळ बोगस आश्वासन ठरून राहील.

## लोटस तलावातील भरावकाम अखेर बंद
### सिडको विरुद्ध मनपा आणि पर्यावरणप्रेमी यांच्यात वाद

■**नवी मुंबई** : पर्यावरणप्रेमी आणि लोकप्रतिनिधींच्या निषेध विरोधानंतर गुरुवारी अखेर लोटस तलावातील भरावाचे काम थांबवण्यात आले आहे. ठेकेदारांनी भराव करण्यासाठी आणलेले पोकलेन यंत्र तसेच इतर वाहने माघारी नेल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मात्र दुसऱ्याच दिवशी या तलावात भराव टाकण्यासाठी सिडकोने नेरूळ पोलीस ठाण्याकडे संरक्षण मागितल्याचे पत्र दिवसभर समाज माध्यमातून फिरत असल्याचे दिसून आले.

मात्र याबाबत सिडकोच्या प्रतिनिधींनी मौन बाळगले असल्याचे दिसून येत आहे. नवी मुंबईतील नेरूळ सेक्टर २८ भूखंड क्रमांक २ येथील पाणथळ तलाव असून त्याला लोटस म्हणून ओळखले जाते. याच तलावात प्रचंड मोठ्या प्रमाणात भराव टाकण्यात येत होता.

या लोटस तलावात सिडकोने भराव टाकण्याची परवानगी मे. ठाकूर इन्फ्रा (टीआयपीएल) या ठेकेदार कंपनीला दिली होती. मागील दोन दिवस पर्यावरणप्रेमी, नागरिक, स्थानिक नगरसेवक यांच्या विरोधाला न जुमानता ठेकेदाराने भराव करण्याचे काम सुरू ठेवले होते. परंतु लोकप्रतिनिधी व पर्यावरणप्रेमी यांच्या विरोधामुळे अखेर भरावाचे काम थांबवले आहे. परंतु तरीदेखील टीआयपीएल कंपनीने लोटस तलावात जवळजवळ १०० डंपर भराव टाकला आहे.



उच्च न्यायालयाने लोटस संरक्षित पाणथळ तलावाचे संवर्धन करण्याचे आदेशित केलेले असताना लोटस तलाव बुजवण्याचा सिडकोचा प्रयत्न होता, परंतु तो सफल झाला नाही. लोटस तलाव संरक्षित करण्यासाठीचा अंतिम निर्णय झालेला नसल्याने या पाणथळ तलाव वाचवण्यासाठी सातत्याने आवाज उठवणार असल्याचा विश्वास नागरिकांनी व पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केला आहे.

### जमीन भूमाफियांच्या घशात घालण्याचा डाव
या ठिकाणी भराव टाकण्यासाठी संरक्षण मागितल्याचे पत्र समाज माध्यमात फिरत असून असे पत्र आम्हाला प्राप्त झाले नसल्याची माहिती पोलिसांनी दिली तर याप्रकरणी अनेकदा प्रयत्न करूनही सिडको प्रतिनिधींशी संपर्क न झाल्याने प्रतिक्रिया मिळू शकली नाही. हा तलाव बुजवून सिडको भूमाफियांची मदत करीत आहे. जर भराव टाकला तर जमीन भूमाफियांच्या घशात घालण्याचा डाव सिडको अधिकाऱ्यांचा असल्याचा आरोप सिडकोवर होत आहेत.

## पुरोगामी कोल्हापूरमध्ये खळबळ! पंचगंगेच्या घाटावर रात्री ११ वाजता अघोरी प्रकार

■**कोल्हापूर** : झपाटलेल्या बाईच्या अंगातून मांत्रिकाक रवी भूत काढण्याचा अघोरी प्रकार कोल्हापुरात उघडकीस आलाय. कोल्हापुरातल्या पंचगंगा नदी घाटावर हा प्रकार घडला असून रात्रीच्या अंधारात पंचगंगा घाटावर मांत्रिकाकडून भूत काढण्याचा अघोरी प्र-कार केला जात असल्याच व्हिडिओमध्ये दिसून येत आहे. हा सर्व प्रकार सोमवारी रात्री ९ ते ११ च्या दरम्यान घडल्याचं काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितलय. याप्रकरणी अद्याप कोणावरही कारवाई झाली नसून थेट पंचगंगा घाटावर अशा प्रकारची घटना घडल्यामुळे संबंधित मांत्रिकावर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आलीय.

दरम्यान, प्रत्यक्षदर्शी व्यक्तींनी काही सामाजिक कार्यकर्त्यांना बोलावून घेतलं. मांत्रिकाला जाब विचारण्यास गेल्यानंतर घाबरून मांत्रिक तेथून पळून गेला. मात्र या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियामध्ये व्हायरल झाल्यानंतर एकच खळबळ उडाली असून शाहूंच्या या नगरीत भोंदूगिरीला स्थान नाही. अशा भोंदूगिरी करणाऱ्या बाबांवर पोलिसांनी त्वरित कारवाई करावी अशी मागणी प्रत्यक्षदर्शी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केलीय.



राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कोल्हापूर नगरीत आजवर कधीच अंधश्रद्धेला स्थान मिळालं नाही. मात्र गेल्या काही दिवसात भोंदूगिरीचे अनेक प्रकार कोल्हापुरात घडत आहेत. या भोंदूगिरीला कोल्हापुरातील अनेक सर्वसामान्य नागरिक बळी पडत असून असाच एक प्रकार काल रात्री उघडकीस आलाय. पंचगंगा नदी घाटावर झपाटलेल्या असल्याच्या संशयावरून एका महिलेवर मांत्रिकाकडून भूत काढण्याचा अघोरी प्रकार स-रू असल्याच समोर आलाय. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार रात्री १० ते ११च्या दरम्यान घडल्याचं स्थानिक प्रत्यक्षदर्शी यांनी सांगितलय. हा प्रकार इतका भयानक होता की याचे व्हिडिओ सोशल मीडियामध्ये व्हायरल झाले असून एकच खळबळ उडालीय.

व्हायरल होत असलेल्या व्हिडिओ आणि प्रत्यक्षदर्शींनी सांगितलेल्या माहितीनुसार, कोल्हापुरातील पंचगंगा घाट येथे रात्री दहा ते अकराच्या दरम्यान पाच ते सहा पुरुष आणि एक महिला पंचगंगा घाट परिसरात आले. इतक्यात तथाकथित मांत्रिक घाटावर पोहोचला. सर्वजण घाटावर नदीकिनारी बसून जेवत असताना अचानक आरडाओरडा सुरू झाली. महिला झपाटलेली असल्याचा म्हणत त्या मांत्रिकाने तिला जोरजोरात ओरडायला लावलं, तिच्या अंगावर फुंकी मारली, काही विचित्र क्रिया केल्या. आरडाओरडा होत असल्याचं तिथेच बाजूला बसलेल्या काही नागरिकांना कानावर पडताच ते तेथे पोहोचले. त्यातील एका व्यक्तीने हा सर्व प्रकार मोबाईल मध्ये कैद केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com